# आदित्यदीप

वर्ष : १३ / अंक : २

एप्रिल ते जून २०२२





**'श्रीरामकथा' तुळशीबाग राममंदिर, पुणे**
**दिनांक – ४ ते ७ एप्रिल २०२२**

एप्रिल ते जून २०२२ शके १९४४

"आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।।"



# आदित्यदीप



कार्यकारी संपादक
सौ. अपर्णा अभ्यंकर

(आदित्य प्रतिष्ठानचे वार्तापत्र)

संस्थापक-संपादक
गुरुदेव शंकर अभ्यंकर

वर्ष : १३ अंक : २

## अंतरंग


श्रीमहाविष्णुयाग – दि. २२ मे २०२२ २

संपादकीय – शुभकृत् संवत्सरी शुभ वर्तावे । – सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर ३

अध्यात्मबोध – गुरुदेव ९

विजय योगी आदित्यनाथांचा, रणसंग्राम हिंदुत्वाचा! – सौ. प्राजक्ता नितीन जोशी १२

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव : सद्यस्थिती आणि अपेक्षा – श्री. केदार केळकर १६

काश्मीर फाईल्स – सौ. सुलभा श्रीकांत आठवले २३

श्रीरामांचे अरण्यकाण्डातील साहस पर्व – सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर २४

क्षणचित्रे – २७ ते ४०


आजीव सभासद वर्गणी रु. २०००/- (१० वर्षांसाठी) आजच आदित्यदीपचे वर्गणीदार व्हा!



# श्रीमहाविष्णुयाग

**वैशाख कृ. सप्तमी, शके १९४४**

**दि. २२ मे २०२२**



‘वैश्विक संत भूमी’वर लोणावळ्याजवळ देवले-औंढोली येथे श्रीमहाविष्णू मंदिराच्या उभारणीला प्रारंभ झाला आहे. त्यानिमित्त आपण दि. २२ मे २०२२ या शुभ दिवशी ‘श्रीमहाविष्णुयाग’ संपन्न करणार आहोत. याग, सामूहिक विष्णुसहस्रनाम पठण, प्रसाद आणि आशीर्वचन असा कार्यक्रम असेल. विष्णुयाग क्वचित केला जातो. गुरुदेवांच्या मार्गदर्शनानुसार, ज्ञानसंपन्न विद्वत् जनांच्या आधिपत्याखाली हा यज्ञ संपन्न होणार आहे. त्याचे संयोजन खालीलप्रमाणे राहील–

१) सकाळी ७ वाजता भूमीवर पोहोचायचे. ७.३० वाजता याग सुरू होईल. ९.३० ते १० नाश्ता. मग हवन स्वाहाकार. त्यानंतर सामूहिक विष्णुसहस्रनाम स्तोत्र पठण. मग प्रसाद. ३ वाजता तेथून परतीला निघायचे. २) गाड्या पुणे, मुंबई व ठाणे येथून निघतील. गाडीचा माणशी खर्च रु. ६००/- इतका येईल. अथवा स्वतंत्र गाडीनेही येऊ शकता. ३) आपण येणार असल्याचे कृपया खालील पैकी एकाच केंद्रावर कळवावे. आपले नाव, गाव व पत्ता तसेच मोबाईल नंबर लिहावा. इतर गावच्या श्रद्धेय साधकांनी पुणे-मुंबईपर्यंत आपापले यायचे आहे.

**पुणे केंद्र – आदित्य प्रतिष्ठान (मोबाईल : ८४८४९२११३०)**


**दादर केंद्र – सौ. विशाखा बिळगी (मोबाईल : ९६१९५६५३८१)**

**ठाणे केंद्र – डॉ. सौ. उमा मोघाकर (मोबाईल : ९८३३५६७६६४)**

४) दररोज पठण करत असाल तरच यायचे अशी अट नाही. तसेच नातेवाईकसुद्धा येऊ शकतात. ५) तसेच आदित्य प्रतिष्ठानच्या खात्यात पैसे जमा केल्यावरच आपले येणे निश्चित समजले जाईल. खाते क्रमांक पाठवत आहे. तेथे पैसे जमा केल्यावर कृपया आदित्य प्रतिष्ठानकडे कळवावे. यागासाठी वेगळे मूल्य नाही. आपण त्या दिवशी ऐच्छिक देणगी देऊ शकता. धान्य वा वस्तू स्वरूपात कृपया काही आणू नये. कारण हवन द्रव्ये गुरुजी आणणार आहेत. ६) सर्वांनी भारतीय पोशाखात यावे. ७) **सर्वात महत्त्वाचे – आपण येत असल्याचे दि. १५ मे च्या आत कळवावे. नियोजनासाठी ते अत्यावश्यक आहे.** शुभस्य शीघ्रम् हे ध्यानी घ्यावे.

गुरुदेवांबरोबर यज्ञ करण्याचा हा योग आहे. आपण निश्चित बहुसंख्येने सहभागी व्हाल याची खात्री आहे.

**– सौ. अपर्णा अभ्यंकर व संयोजक मंडळ**



संपादकीय



# शुभकृत् संवत्सरी शुभ वर्तावे !

– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर

दि. २ एप्रिलला तिथीने आणि दि. १४ एप्रिलला तारखेने आदित्य प्रतिष्ठानने ४० व्या वर्षामध्ये पदार्पण केले. ४० वर्ष जेव्हा एक संस्था सातत्याने काम करत राहते तेव्हा साहजिकच प्रश्न असा येतो की स्थापना झाल्यापासून संस्थेने प्रतिष्ठानच्या विश्वस्तपत्रामध्ये (ट्रस्ट डीडमध्ये) जी उद्दिष्टे उल्लेखिली आहेत त्याप्रमाणे आदित्य प्रतिष्ठानचे कार्य झाले का? चालू आहे का? आणि पुढे होणार आहे का? आपण याचा आढावा घेऊ. संस्थेची स्थापना दि. १४-०४-१९८३ या दिवशी झाली. विश्वस्तपत्रात सुरुवातीलाच गुरुदेव लिहितात–

*‘१) गेली बारा वर्षे मी शिक्षण क्षेत्रात अध्यापनाचे काम करतो आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातील उदासीनता, भारताच्या तेजस्वी सांस्कृतिक परंपरेची अनास्था, नैतिक व शाश्वत मूल्यांचा सार्वत्रिक ऱ्हास ही आज असलेली परिस्थिती धक्कादायक व भयावह आहे. भारत आज संक्रमणावस्थेतून जात असल्यामुळे ही परिस्थिती पालटणे, ही काळाची गरज आहे. त्यासाठी सार्वत्रिक सकस, विधायक आणि कसोशीचे प्रयत्न झाले पाहिजेत. या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे लोकशिक्षण व समाजप्रबोधन होय. समाजपुरुषाची मरगळ जाऊन तो रसरसून उभा राहिला म्हणजे राष्ट्राचे उज्ज्वल भवितव्य घडणार आहे. त्यासाठी जीवनमूल्यांची प्रतिष्ठापना, सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यास, लोकशिक्षण व समाजप्रबोधन यांची नितांत आवश्यकता आहे. या गोष्टी सिद्ध करण्याचा विधायक प्रयत्न करणे, हा आदित्य प्रतिष्ठानच्या स्थापनेचा मूलभूत हेतू आहे.*

*३) आदित्य प्रतिष्ठानची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत–*

*अ) भारताच्या तेजस्वी सांस्कृतिक इतिहासाचे जतन व पुनरुज्जीवन करणे.*

*आ) शैक्षणिक व नैतिक मूल्यांची जोपासना करणे. ही शाश्वत मूल्ये समाजात संक्रमित करण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न करणे.*

*इ) लोकशिक्षणाद्वारे समाजप्रबोधन घडविणे.*

*ई) सद्रुचिसंपन्न वाङ्मयाचे प्रकाशन व प्रचार करणे.*

*उ) विविध कलांचे जतन व संवर्धन करणे.*

*४) कलम (३) मध्ये उल्लेखिलेली उद्दिष्टे सफल करण्यासाठी खालील व तत्सम उपक्रम कार्यान्वित करणे–*

*अ) काळाच्या ओघात नष्ट होत असलेल्या ऐतिहासिक वास्तू, शिल्पे, चित्रे, किल्ले इत्यादी सांस्कृतिक गौरवचिन्हांचे पुढील पिढ्यांच्या प्रेरणेसाठी प्रतिकरूपाने वा अन्य रूपाने जतन करणे व समाजाला त्यांची माहिती देऊन लोकशिक्षण घडविणे.*

*आ) भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अनेक गौरवशाली संस्कृतींनी आपली पदचिन्हे उमटवली. त्या सर्व संस्कृतींचा चिकित्सक अभ्यास करणे, संशोधन करणे, त्यावर ग्रंथ प्रकाशित करणे व अन्य माध्यमातून त्यांचे जतन करणे.*

*इ) वनसंपत्ती, पशुपक्षी, नद्या, उपनद्या, सागर म्हणजे भारतीय संस्कृतीची अविभाज्य व संपन्न अंगे आहेत. त्यांचा चिकित्सक, संशोधनपर अभ्यास करणे.*

*ई) इतिहासातील महापुरुष, संत, शास्त्रज्ञ, समाजसुधारक इत्यादी महान व्यक्तिमत्त्वांचा सांगोपांग अभ्यास करणे.*

*उ) महापुरुषांच्या जीवनावर व्याख्याने आयोजित करणे.*

*ऊ) विद्यालयीन, महाविद्यालयीन व खुल्या निबंधस्पर्धा आयोजित करणे.*

*ए) बालवाङ्मयाचे प्रकाशन करणे व निर्मितीस प्रोत्साहन देणे.*

*ऐ) व्याख्याने व मेळावे या माध्यमातून महिलांत जागृती करणे.*

*ओ) चांगली शैक्षणिक व्याख्याने पुस्तकरूपाने प्रकाशित करणे.*

*औ) चित्र, शिल्प, नृत्य नाट्य, संगीत व वास्तू इत्यादी कलांचे जतन, संवर्धन करणे.*

*क) विविध वाद्यांचे संग्रहालय करणे.*

*ख) संस्कृतीच्या आदान-प्रदानासाठी आवश्यकतेनुसार देशांतर्गत व परदेशीही दौरे करणे.*

*ग) रंगीत स्लाईडसच्या माध्यमातून महापुरुष, संत, शिल्पे, किल्ले इत्यादी संस्कृतीच्या सर्वांगाचे दर्शन समाजाला घडवणे.*

*घ) वरील उपक्रम लोकशिक्षणार्थ राबवण्यासाठी अद्ययावत अशी 'दृक्-श्राव्य प्रयोगशाळा' (Audio-Visual Laboratory) उभारणे व रेकॉर्ड प्लेअर, टेप रेकॉर्डर, स्लाईड प्रोजेक्टर, मुव्ही प्रोजेक्टर, टी. व्ही. रेडिओ इत्यादी विविध माध्यमांचा उपयोग करणे.*

*५) माझ्या आजवर प्रकाशित ग्रंथांची मला मिळालेली जी मानधनाची रक्कम आहे, त्यापैकी रुपये १,०००-०० (रुपये एक हजार मात्र) मी 'आदित्य प्रतिष्ठान' या सार्वजनिक धर्मादाय न्यासात समाविष्ट करत आहे.'*

चाळीस वर्षापूर्वी प्रतिष्ठान का स्थापन केले हे विश्वस्तपत्रातील मजकूर वाचल्यावर आपल्या बरोबर लक्षात येईल. त्याचबरोबर हेही लक्षात येईल की प्रतिष्ठानची गंगाजळी फक्त १००० रु. मात्र एवढीच होती.

खरे तर मला पत्नी म्हणून नेहमी प्रश्न पडायचा की यातील कोणतेही एक उद्दिष्ट गाठायचे तर त्याला धनाची जुळणी करावयास हवी. स्वत: अभ्यंकर अत्यंत संकोची स्वभावाचे. पैशाची अडचण तर ते कोणालाच सांगणार नाहीत. प्रापंचिक जबाबदाऱ्या होत्याच. परंतु बुद्धी, लेखणी, चिकाटी आणि आत्मविश्वास याच्या जोरावर अभ्यंकरांनी हे पाऊल उचलले. माझ्या वडिलांचा कै. अच्युत कृष्ण कोल्हटकर यांचा या कार्यारंभाला भरपूर पाठिंबा लाभला.

आत्तापर्यंत अभ्यंकरांची लेखणी अनेक क्षेत्रात संचार करत होती. विविध मासिकांमधून त्यांचे अनेक लेख प्रकाशित झाले. त्यामध्ये लॉरेल-हार्डी-चिरंजीव जाड्या-रड्या, क्रिकेटमधील अगणित किस्से, क्रीडांगण मासिकाचे संपादक असल्यामुळे क्रिकेटर्सच्या मुलाखती, अनेक इंग्रजी कथांचे मराठी भाषांतर, बुद्धिबळावरील लेख, प्रसिद्ध व्यक्तींवरील चरित्रात्मक लेख असे विशेष जे मला आठवले ते सांगितले. शाळेमध्ये व कॉलेजमध्ये शिक्षक असल्याने त्यांनी गॅदरिंगसाठी व स्पर्धासाठी अनेक एकांकिका लिहिल्या, ज्याची आठवण त्यांचे विद्यार्थी अजूनही काढतात.

याशिवाय गायनस्पर्धांमध्ये भाग घेणे, संगीत-नाटके बसविणे इ. चालू होतेच. त्यामुळे व्यावसायिक रंगभूमीवर काम करण्याविषयी, चित्रपटात काम करण्याविषयी विचारणा चालू झाल्या. मला खात्री आहे, संगीत, नाटक, शास्त्रीय संगीत कोणतेही कलादालन त्यांनी निवडले असते तरी तेथे त्यांनी विशेष ठसा उमटवला असता.

१९८३ यावर्षी प्रतिष्ठानची स्थापना झाल्यावर त्यातील उद्दिष्टांप्रमाणे अर्थातच कार्य करावे हा भाव त्यांच्या मनात तीव्रतेने जागला आणि मग जीवनाला एक वेगळी दिशा प्राप्त झाली.

'निन्दन्तु नीतिनिपुण: यदि वा स्तुवन्तु ।
लक्ष्मी: समविशतु गच्छतु वा यथेष्टम् ॥
अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा ।
न्याय्यात्पथ: प्रविचलन्ति पदं न धीरा: ॥'

भर्तृहरीच्या नीतिशतकातील या श्लोकाप्रमाणेच जणू आमची वाटचाल सुरू झाली. अर्थात् ही वाटचाल सोपी तर नव्हतीच. चरितार्थासाठी कॉलेजमधील नोकरी सांभाळून हे सर्व करायचे होते. बाहेर जी व्याख्याने होत, लेखन होई त्याचे मानधन आम्ही प्रतिष्ठानच्या खात्यात जमा करू लागलो. लक्षात आले की प्रतिष्ठानची उद्दिष्टे साध्य करावयाची असतील तर काही वेगळा मार्ग अवलंबिला पाहिजे आणि म्हणून 'साक्षात्कारी संतांचा भक्तियोग' अशी ६ ग्रंथांची मालिका अभ्यंकरांनी लिहायला घेतली आणि आता इतर विषय मागे पडून या वैचारिक वाङ्मयावर अभ्यंकरांचे मन केंद्रित झाले. कारण लोकशिक्षण व संस्कृतिसंवर्धन या मुख्य दोन उद्दिष्टांचा तो शुभारंभ होता. यासाठी प्रतिष्ठानने एक योजना राबवली. ६०० रुपये ६ वर्षांसाठी ठेव म्हणून द्या आणि ६ वर्षांनी ठेव परत व होतील तसतसे ग्रंथ विनामूल्य भेट मिळतील. गणेश चतुर्थीला हे निश्चित केले. पहिले ६०० रुपये माझे सर्वात मोठे दीर श्री. माधव अभ्यंकर यांनी दिले आणि म्हणाले, 'उत्तम योजना आहे. छान लेखन कर!' यानंतर आमच्या इष्टमित्रांकडून याला उत्तेजन मिळाले. व २१ सभासद पूर्ण झाले आणि मग हळूहळू सभासद संख्या १००० पर्यंत पोहोचली. या सर्व उपक्रमात आम्हाला उत्तम सहयोगी मिळाले ते म्हणजे श्री. बापूराव कोपरकर. तेही त्यांच्या परिवारात या कार्याचा प्रसार करू लागले आणि ६ वर्षात ६ ग्रंथ लिहून पूर्ण झाले व ग्रंथ आणि ठेवपरती या दोन्हीचेही वितरण पूर्ण झाले.

या जोडीला स्लाईडस् तयार करणे व त्याचे विविध शाळांत स्लाईड शोज करणे सुरू झाले. झांशीची राणी, किल्ले रायगड, गुलाब- फुलांचा राजा, छत्रपती शिवाजी महाराज, सुनील गावसकर असे अनेक विषय. स्लाईडस आणि त्यावर अभ्यंकरांचे निवेदन! मी स्लाईडस् दाखवत असे. श्रोते खिळून बसत. विद्यार्थी उत्तम संस्कार घेऊन जात. प्रोजेक्टररूपी बाळाला मांडीवर घेऊन आम्ही बसने, रिक्षाने प्रवास करत असू. असे १५०० प्रयोग आम्ही महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही केले. हा खूप अभिनव उपक्रम होता. तेव्हा ४०-४५ वर्षापूर्वी आत्तासारखे तंत्रज्ञानाचे आक्रमण नव्हते. प्रोजेक्टरचा बल्ब मिळवायला सुद्धा त्रास होई. पण विशेषत: मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून आमचे श्रम सार्थकी लागत. मी प्रोजेक्टरबरोबर मुलांमध्येच बसलेली असायची. 'झांशीची राणी' पाहताना विद्यार्थिनी ढसाढसा रडत. खात्री आहे की त्या सर्वजणी उत्तम माता नक्कीच बनल्या असतील. या यशस्वी प्रयोगाला एनसीईआरटी कडून विशेष पुरस्कार मिळाला. शाळांमधून प्रयोग झाला की शिक्षक विद्यार्थ्यांकडून १० रु., २० रु. असे गोळा करून रक्कम प्रतिष्ठानला देत. ही जमा झालेली गंगाजळी पुढच्या कार्याचा प्रारंभ होता. याशिवाय विविध संस्थांमधून व्याख्यानांसाठी आमंत्रणे येत होतीच. कारण आता 'वक्ता' म्हणून अभ्यंकरांचा लौकिक होऊ लागला होता.

**दुसरा टप्पा –** संत वाङ्मयाचा अभ्यास करत असताना गुरुदेवांच्या असे लक्षात आले की संतांच्या वाङ्मयातील संदर्भ एकत्र कोठेही मिळत नाहीत. संतवाङ्मय प्रचंड आहे, पण त्याचे नीट संकलन नाही. यासंदर्भात कोशवाङ्मय खूप मदत करते. म्हणून असे कोशवाङ्मयाचे कॅटलॉग बघायला अभ्यंकरांनी सुरुवात केली. कोठेही असा संदर्भ

मिळाला नाही. म्हणून मग पुढचा संकल्प असा धरला की पंचखण्डात्मक भक्तिकोश तयार करायचा. जणू ईश्वराने हे काम आदित्य प्रतिष्ठानसाठी राखून ठेवले होते. त्यासाठीही ठेव योजना केली. रु. ५०००/- ८ वर्षांसाठी द्या आणि भक्तिकोशाचे ५ खण्ड विनामूल्य घ्या व ८ वर्षांनी ठेव परत. ही योजनाही यशस्वी होऊ लागली. लोकांना आवडू लागली. प्रश्न होता की लोकांपर्यंत पोहोचायचे कसे? १९९१ सालच्या मे महिन्यात हे, मी, बापूराव कोपरकर अशी आम्हा तिघांची एक बैठक झाली आणि अभ्यंकरांची १५ दिवसांची रामायण प्रवचनमाला करायची व भक्तिकोश संकल्पाचा प्रसार करावयाचा हे ठरले. पुण्यातील शिवाजीमंदिराचे भाडे, ध्वनी व्यवस्था, जाहिरात याचा खर्च किती होईल हा अंदाज काढला. यशस्वी झालो तर प्रश्नच नव्हता. नाहीतर साठलेले धन कमी होणार, पण हे करायचेच असे निश्चित केले आणि मग काहीसे एकांतप्रिय असलेले, अंतर्मुख असलेले अभ्यंकर समाजाभिमुख झाले. सायंकाळी ५.३० वाजले की मंदिराचे प्रांगण लोकांनी फुलून जात असे. उदंड प्रतिसाद मिळाला. साताराच्या राणीसाहेब सुमित्राराजे भोसले या भक्तिकोश समितीला पहिल्या अध्यक्षा लाभल्या. त्या उद्घाटनाला आल्या आणि १५ दिवस रामचरित्रात श्रोते आकंठ बुडून गेले आणि विशेष म्हणजे ५००० रुपये देणारे २५ सभासद या प्रवचनमालेत लाभले. तेव्हा व्यासपीठ सजवणे, आरतीची तयारी, पाहुण्यांचा सत्कार, ते आरती म्हणणे, कक्ष सांभाळणे यासाठी मी, माझी आई, माझी दोन मुले, बापूराव आणि कार्यालयीन १ व्यक्ती, एवढेच कार्यकर्ते होतो. पण उत्साह अमाप होता. ही प्रवचनमाला यशस्वी झाली आणि मग थांबायला वेळच राहिला नाही.

याचबरोबर गुरुदेवांनी व्रताप्रमाणे गेली २९ वर्षे आषाढी एकादशीला वारकरी कीर्तनाची अखंड परंपरा चालवली. आता पुण्यामध्ये आषाढीला लोक दाटीवाटीने कीर्तन ऐकतात. ब्रह्मानंद अनुभवतात.

भारतीय संस्कृतीचा गरिमा वाढवणारी संतचरित्रे, लोकोत्तर महात्म्यांची चरित्रे, भारतीय तत्त्वज्ञान, त्याचा कळस असणारी श्रीमद् भगवद्गीता अशा १०० हून अधिक विषयांवर १५ हजारहून अधिक प्रवचने आजपर्यंत अभ्यंकरांनी दिली. प्रतिष्ठानचे वैभव असलेले प्रतिष्ठानचे निस्पृह कार्यकर्ते प्रतिष्ठानला लाभले. काही आजपर्यंत कार्यरत आहेत, काहीजण काळाआड गेले, काहीजण थांबले, पण कार्य चालूच राहिले. परंतु आदित्यव्रतींची एक नि:स्पृह कार्यकर्त्यांची सात्त्विक साखळी गावोगावी निर्माण झाली आहे याचा ब्रह्मानंद मनामध्ये आहे. प्रतिष्ठानची केंद्रे काही गावात निर्माण झाली. १९९१ ते २०२१ या तीस वर्षांच्या कालखण्डात प्रतिष्ठानची उद्दिष्टे सफल होतील असे अनेक उपक्रम यशस्वी झाले–

१) लिहायला घेतलेला पंचखण्डात्मक भक्तिकोश १० वर्षात पूर्ण झाला. सुमारे अडीच हजार पृष्ठे होतील असा अंदाज होता. पण ५६०० पृष्ठे असलेले डबल डेमी आकाराचे ५ ग्रंथ- भारतीय आचार्य, भारतीय संत, भारतीय संप्रदाय, भारतीय उपासना, भारतीय तीर्थक्षेत्रे आणि मंदिरे- हे सिद्ध झाले. आज संदर्भ ग्रंथ म्हणून मान्यता पावलेले हे ग्रंथ अनेकांच्या घरी व वाचनालयात स्थित आहेत. तसेच ५००० रुपये ठेव परत केली. परंतु ग्रंथाचा आकार पाहून अनेकांनी ती देणगीत रूपांतरित केली.

२) याबरोबर विविध अशा ७० विषयांवरील ग्रंथ व पुस्तिका प्रकाशित झाल्या, ज्यांना अनेक राज्य व राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. तसेच माझे आजोबा कृ. के. कोल्हटकर यांनी लिहिलेला 'पातञ्जल योगदर्शन' या विश्वमान्य ग्रंथाच्या अनेक आवृत्ती आम्ही प्रतिष्ठानच्या वतीने प्रकाशित करू शकलो हे महद्भाग्य. या कालखण्डात अभ्यंकर विद्यावाचस्पती व नंतर प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांचे गुरुदेव बनले.

३) प्रतिष्ठानचे स्वत:च्या भूमीवर कार्यालय उभे राहिले. आणि आता यावर्षी कर्वेनगरमध्ये अजून एक तीन मजली इमारत उभी राहते आहे, जेथे प्रतिष्ठानचे सर्व उत्सव संपन्न होऊ शकतील अशी ती देखणी इमारत होते आहे.

४) प्रतिष्ठानच्या वतीने 'आदित्यदीप' हे त्रैमासिक काढले जाते. उत्तम लेख असलेला, सांस्कृतिक तसेच आध्यात्मिक दर्जा असलेला हा अंक लोकांना अतिशय आवडतो. कोरोना कालखण्डात ई-अंक काढला गेला. दिवाळीपासून छापील अंक काढला जाईल.

५) या कामाच्या प्रसारासाठी परदेशातही अनेक (युएसए, युके, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, दुबई, अबुधाबी इत्यादी) दौरे झाले. व्याख्याने व प्रवचने झाली आणि पुन:पुन्हा निमंत्रणे येत राहिली, येत आहेत.

६) प्रतिष्ठानची उद्दिष्टे सफल होतील अशा आजपर्यंत १८ तीर्थपर्यटन यात्रा काढल्या गेल्या. अंदमान (२ वेळा), नैमिषारण्य (२ वेळा), हरिद्वार, मथुरा-वृंदावन, पंचशिवतत्त्व- तमिळनाडू, वाराणसी-प्रयागराज, आसाम, मध्यप्रदेश, गोवा, दुबई-अबुधाबी, लंडन-मार्से, नेपाळ, श्रीलंका, थायलंड. आपल्या देशात अशी अनेक अद्भुत तीर्थक्षेत्रे आहेत की त्यांचे दर्शन घ्यावे, पावन व्हावे.

यामध्ये आम्ही अंदमानला जाऊन सावरकरांना मानवंदना दिली. त्यांनी मार्से येथे बोटीतून उडी मारली या प्रसंगाला १०० वर्षे झाली म्हणून आम्ही तेथे जाऊन मानवंदना दिली, श्रीलंकेत जाऊन रामायणाचा शोध घेतला, नेपाळला जाऊन पशुपतिनाथाचे दर्शन घेतले. प्रत्येक यात्रेला उदंड प्रतिसाद मिळाला आणि प्रत्येक स्थळी गुरुदेवांची प्रवचने झाली. तो आनंद वेगळाच होता.

**टप्पा तिसरा –** आता प्रतिष्ठानच्या वतीने लोणावळा येथे ३३ एकर जागेवर उभे राहते आहे 'वैश्विक संत भारती'.

संतांचे तत्त्वज्ञान नुसते वाचून भागणार नाही ते जपले पाहिजे, वर्धिष्णू केले पाहिजे ज्याची आजच्या काळात अत्यंत गरज आहे. म्हणून प्रतिष्ठानने लोणावळ्याजवळ ३३ एकर जागा प्रवचनांमधून व देणग्यांमधून खरेदी केली आहे. सरोवर निर्माण झाले आहे, वृक्षारोपण झाले आहे, नकाशा मंजूर झाला आहे. २,११,००० चौ. फू. बांधकामाला पीएमआरडीए कडून मान्यता मिळाली आहे. बांधकामाला सुरुवात झाली आहे. आणि जवळजवळ ४० हजार स्क्वे. फुटाची मंदिराची व प्रदर्शनाची पायाभरणी पूर्ण झाली आहे. आता लवकरच उदार देणगीदारांच्या साहाय्याने मंदिर उभारणीला सुरुवात होईल. आतापर्यंतचे हे काम २५००० रु. देणाऱ्या महाजनांच्या आणि १ लक्ष रुपये देणाऱ्या वैष्णवजनांच्या सहकार्याने उभे राहिले आहे. या महाजनांना, वैष्णवजनांना या विद्यापीठात वर्षातून एकदा विनामूल्य काही दिवस राहता येईल. तसेच त्यांचे नाव या विद्यापीठात कलात्मक रीतीने कोरले जाईल. ११ लक्ष रुपये देणारे कक्षदातेही आम्हाला मिळाले. शिवाय या व्यतिरिक्त देणगी देणारे हजारो सात्त्विक कर्ते आहेत. आम्ही त्या सर्वांविषयी कृतज्ञ आहोत.

संतांच्या विचारांचे रक्षण करावयाचे असेल, त्यांना अंतरराष्ट्रीय स्तरावर न्यायचे असेल तर अशा विद्यापीठाची गरज आहे. तिथे आपण एक असा ५ वर्षांचा अभ्यासक्रम राबवणार आहोत की तेथून हिंदू धर्माचे प्रसारक तयार होतील. आपण असे काही केले नाही तर आपले पूर्वज आपल्याला करंटे म्हणतील आणि आपल्या पुढच्या पिढ्या म्हणतील आमच्या पूर्वजांनी आम्हाला काहीच दिलं नाही. तेव्हा प्रत्येकाने ही 'वैश्विक संत भारती' उभी रहावी ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असं लक्षात घेऊन यासाठीच्या योजनांमध्ये सहभागी व्हा. महाजन व्हा. एक लाख रु. देऊन वैष्णवजन व्हा अथवा एकेका विभागाचे प्रायोजक व्हा.

आता या भूमीवर विशाल सरोवर, संरक्षक भिंती, वृक्षारोपण, कार्यालय, आमराई, रस्ते इत्यादींसह पहिल्या टप्प्यात ४० हजार स्क्वे. फूटांचा मोठा पाया पूर्ण करण्यात आला असून यासाठीच केवळ ८ कोटी रुपये खर्च झाले आहे. आता या संपूर्ण प्रकल्पाचे अधिष्ठान म्हणून भव्य व सुंदर विष्णुमंदिर उभे राहात आहे. तेव्हा या मंदिर उभारणीसाठी मंगलनिधी जमा करण्याचे काम जोरात सुरू आहे. अनेकजण श्रद्धादान करत आहेत. मंदिर उभारणे किती अवघड व खर्चिक असते हे श्रद्धेय वाचक जाणतातच! **आपण विष्णुमंदिर केवळ लोकाश्रयावर उभे करत आहोत. तेव्हा सढळ हाताने मदत करा ही विनंती.**

प्रतिष्ठानची 'वैश्विक संत भारती' ही अलौकिक संकल्पना आहे. हिंदूंचे एक दिव्य प्रेरणास्थान येथे उभे राहणार आहे. अर्थात हे स्थान पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरणार आहे. भोगवादाच्या लाटेत सापडलेल्या जनांना हा विसावा ठरणार आहे. येथील श्रीविष्णूचे मंदिर नेत्रांना तृप्त करेल. येथील प्रदर्शने हजारो विद्यार्थ्यांना प्रेरणा देतील, येथील भक्तनिवास शरीराला शांती देईल, येथे होणारे कार्यक्रम कान तृप्त करतील आणि येथे शिकणारे विद्यार्थी नवीन समाज घडवतील, समृद्ध भारतीय संस्कृतीचे प्रचारक होतील.

या, आपण सर्वजण मिळून गुरुदेवांसमवेत हे मंदिर साकार करूया. व्यक्तीच्या आयुष्यात ४० वर्षे हा कालखण्ड मोठा असतो, पण संस्था शेकडो वर्षे काम करत राहते. त्यामुळे जोपर्यंत उद्दिष्ट साध्य होत नाही तोपर्यंत आपण अधिक शक्तीने, प्रेरणेने कार्य करूया. कारण प्रतिष्ठानचे ब्रीदवाक्य आहे– 'तमसो मा ज्योतिर्गमय ।'

यावर्षी गुरुदेवांनी ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मंदिराची उभारणी हे त्यांचे ध्येय आहे. आपण सर्वांनी मिळून ते साकार करावयाचे आहे.

या शुभकृत संवत्सरात हे काम अधिक वेगाने पुढे जावो, ही ईशचरणी प्रार्थना!

* * *

**श्रीमहाविष्णु मंदिराचे चाळीस सहस्र चौरस फूटांचे अधिष्ठान!**



# अध्यात्मबोध

नमस्ते गुरुदेव माउली,

मी विमा व्यवसायातून उप महाप्रबंधक/उप सचिव पदावरून मागील वर्षी स्वेच्छानिवृत्ती घेतली.

आपला एक खूप जुना युट्यूब व्हिडिओ नुकताच माझ्या पहाण्यात आला. आपल्या वाणीतून जणू शुक मुनी व बृहस्पती दोघेही बोलत आहेत असे वाटत होते.

व्हिडीओमध्ये जेव्हा आपण वेद, उपनिषदे व भगवद्गीता (प्रस्थान त्रयी), रामायण, महाभारत व भागवत आणि ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकाराम महाराज गाथा व दासबोध असे ११ ग्रंथ (एकंदर २३ ग्रंथ) प्रत्येकानेच वाचावे असे म्हटले तेव्हा आपण जणू माझ्या मनातीलच बोलत आहात असा भास झाला.

याच संदर्भात मला काही छोट्या शंका आहेत.

लहानपणापासून आई-वडिलांचे संस्कार व वडिलांनी अगदी लहानपणीच उपलब्ध करून दिल्याने अक्षरश: हजारो धार्मिक ग्रंथ वयाचे १६/१७ वे वर्षापर्यंतच वाचले व पुढेही आवड कायम राहिली. मधल्या वयात शेकडो इंग्रजी व विदेशी आध्यात्मिक वाङ्मय वाचण्यात आले व मध्यम वयानंतर आता फक्त वैदिक धर्म वाङ्मयच वाचणे निश्चित केले आहे.

रामायण, महाभारत, गीता, दासबोध, एकनाथी भागवत इ. खूपदा वाचले गेले. श्रीमद् भागवतातील जवळजवळ सर्व गोष्टी वाचनात आल्या. ज्ञानेश्वरी व गाथा हेही नवीन नाहीत पण वाचले नव्हते ते वेद व उपनिषदे. त्यामुळे नुकताच काशीला गेलो असताना समग्र ऋग्वेदाचे चार खंड व उपनिषदे घेऊन आलो व ऋग्वेद वाचायला सुरुवात केली.

**आता माझा प्रश्न १) –**

मी ऋग्वेदाची पहिली ७०-८०च पाने वाचली; पण त्यात फक्त 'सोमरस बनवायचे व इंद्र, मरुत, वरुण इ. देवतांना (प्रामुख्याने इंद्राला) बोलवायचे व सोमरस पिऊन आम्हाला आशीर्वाद दे' अशा आशयाचे अगदी प्राथमिक लिखाण आढळले. असेच जर पूर्ण ऋग्वेदात व चारही वेदात वर्णिलेले असेल तर ते किती कंटाळवाणे असेल? वेद हे सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे या माझ्या बालपणीच्या श्रद्धेला या कंटाळवाण्या वाचनाने एकदम तडा गेला. ह्यापेक्षा कितीतरी जास्त सखोल व मनोरंजक भगवान पतंजलींचे अष्टांगयोग, श्रीशिवपार्वती संवादाची गुरुगीता, श्री दत्तात्रय व भक्त संवाद इ. ग्रंथ मला वाटतात.

तरी वेदांकडे प्राथमिक ज्ञानाचे पाठ या दृष्टीने वाचावे का, हे मार्गदर्शन हवे होते.

कृपया वेळात वेळ काढून मार्गदर्शन करावे. माझे वाचनाबाबत वर फक्त माझी पार्श्वभूमी म्हणून लिहिले आहे. जग हे अगाध ज्ञानाचा महासागर असून माझे वाचन एका वाळूच्या कणाएवढेही नाही याची मला जाणीव आहे.

धन्यवाद!

**– किशोर देशपांडे**
वय ५९ वर्षे
फातिमानगर, पुणे.

**उत्तर –** आपण ऋग्वेदाची सुरुवातीची ७०-८० पाने वाचली आणि त्यावरून निष्कर्ष काढलात हेच मुळी चुकीचे आहे. आपल्या अज्ञानामुळे असे घडते. वेदाच्या १० हजार ऋचांमध्ये अगाध ज्ञान आहे. वेद जगातील पहिला धर्मग्रंथ आहे. हे ज्ञान-विज्ञानाचे अथांग भांडार आहे. यात ब्रह्म, देवता, ज्योतिष, गणित, रसायन, औषधी, खगोल, भूगोल, धार्मिक नियम, इतिहास, अशा अनेक विषयांचे ज्ञान भरले आहे. या चार वेदातूनच पुढे उपवेद, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, मोक्षशास्त्र अशा विषयांवर

हजारो ग्रंथ निर्माण झाले. आपण रामायण-महाभारत, गीता, संतवाङ्‌मय यांचा अभ्यास प्रारंभी करणेच इष्ट.

वेदांना अपौरुषेय समजले जाते. ऋषींनी वेद लिहिले नाहीत. त्यांना ईश्वरी कृपेने ते दिसले. त्यांनी ते ग्रथित केले असा भावार्थ!

हिंदू धर्मात सर्वाधिक महत्त्व वेदांना आहे. 'वेदोऽखिलो धर्ममूलम्' हे आचार्य मनूंचे वचन सर्वश्रुत आहे. अखिल वेद हेच हिंदू धर्माचे मूळ आहेत. प्रख्यात भाष्यकार सायणाचार्य म्हणतात, 'ईप्सित फलाची प्राप्ती आणि अनिष्टाची निवृत्ती करण्याचा अगम्य असा उपाय मानवाच्या बुद्धीला जो ग्रंथ दाखवून देतो त्याला वेद म्हणावे.'

वेद हे अक्षर वाङ्‌मय होय. त्यामुळे 'पृथ्वीवर जोपर्यंत पर्वत आणि नद्या आहेत, तोपर्यंत वेदांचा महिमा भूतलावर राहील' असेही सायणाचार्यांचे वचन आहे.

वेदांची वाणी परा (म्हणजे सर्वश्रेष्ठ) आहे. प्रत्यक्ष ऋग्वेदानेच या संदर्भात नि:संदिग्धपणे सांगितले आहे,

'वाणीची चार रूपे असून, ती ज्ञानी अशा ब्रह्मवेत्त्यांनाच अवगत आहेत, वाणीच्या या रूपांपैकी– तिचे चौथे रूप शब्दमय वेदरूपाने लोकात प्रचारात असते' (ऋग्वेद १.१६४.४५).

तात्पर्य, वेद म्हणजे साक्षात् देववाणी असून धर्मसंस्कृतीचा मूलाधारही आहे.

धर्म-अर्थ-काम-मोक्ष हे चार मानवी पुरुषार्थ, ब्रह्मचर्य-गृहस्थ-वानप्रस्थ-संन्यास हे चार आश्रम, ब्राह्मण-क्षत्रिय- वैश्य-शूद्र हे चार वर्ण, देवऋण-ऋषिऋण-पितृऋण- मनुष्यऋण ही चार ऋणे, कुल-ग्राम-विश-जन-राष्ट्र अशी समाज व राष्ट्रजीवनाची बांधणी, शिक्षणाची गुरुकुलपद्धती आणि सर्व तत्त्वज्ञान व दर्शने यांचा मूलस्रोत म्हणून सर्व दृष्टीने वेदाचे मानवसंस्कृतीला अलौकिक योगदान आहे.

हे झाले अपौरुषेय वेदांचे माहात्म्य! **धर्माचे वा तत्त्वज्ञानाचे ग्रंथ मनोरंजनासाठी नसतात, हे ध्यानी घ्यावे. या ग्रंथांचे वाचन, श्रवण, मनन, चिंतन हे सर्व काही आत्मोन्नतीसाठी असते. वेदवाङ्‌मय आणि वेदोत्तर वाङ्‌मय वाचून समजत नाही. ते ज्ञात्या सद्गुरूकडूनच समजावून घ्यावे लागते. तरच अशा वाङ्‌मयाचा अर्थ उलगडत जातो.**

**वेदांच्या एकेका सूक्तांमध्ये अलौकिक तत्त्वज्ञान ठासून भरले आहे. डॉ. आदित्य अभ्यंकरांनी ऋग्वेदातील नासदीय सूक्तावर व्यापक अभ्यास करून पीएच.डी.चा उत्कृष्ट प्रबंध निर्माण केला आहे.**

**हिंदू धर्माचे अधिष्ठान असलेला एखादा ग्रंथ न समजणे म्हणजे त्या ग्रंथाची उणीव नसून आपल्या बुद्धीची सीमारेषा व मर्यादा स्पष्ट होणे असा अर्थ होतो.**

***(आदित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली 'चार वेद' ही पुस्तिका आपण अवश्य वाचावी. – संपादिका)***

**प्रश्न २) –** संत कोणाला म्हटले जाते? विद्यारण्य हे संत होते का नुसतेच स्वामी?

**– सौ. रेखा सुभाष देवधर,** युएसए

**उत्तर –** विद्यारण्यस्वामी आचार्य होत. संत व आचार्य यामध्ये भेद आहे. वैदिक प्रस्थानत्रयीवर (उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व गीता) भाष्य लिहिणाऱ्या प्रज्ञावंताला आचार्य म्हणतात.

गुरुकुले चालवणारे, ज्ञानगंगा पुढे नेणारे आचार्य! वैदिक वाङ्‌मयाचे अध्ययन-अध्यापन हे आचार्यपदाचे प्रधान अंग होय. ही विद्यापरंपरा अक्षुण्ण ठेवण्यात ज्यांचे योगदान आहे त्यांना एका दृष्टीने आचार्य म्हणता येईल. आचार्यांनी आचाराला सर्वश्रेष्ठ मानले. श्रुती, स्मृती, सदाचार व आत्मतुष्टी ही चार धर्मलक्षणे शिरोधार्य केली. गुरुकुले निर्माण केली. शुद्ध उपासना, शुद्ध आयुष्य याचा आदर्श निर्माण केला. अक्षुण्ण परंपरा निर्माण केली. विद्यारण्य स्वामी हे असे

आचार्य होत. आचार्यांची परंपरा प्राधान्याने ज्ञानाची आहे.

संतांची परंपरा प्राधान्याने भक्तीची आहे. आचार्य वाङ्मय संस्कृत भाषेत, तर संतवाङ्मय प्रादेशिक भाषेत आहे. अभंगरचना हे संतवाङ्मयाचे वैशिष्ट्य आहे. 'करी वृत्ति जो संथ तो संत जाणा' हे समर्थ रामदासांचे वचन अत्यंत उद्बोधक आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' वा 'बोले तैसा चाले' अशी संतलक्षणे तुकोबा सांगतात; पण आचार्य, ऋषि-मुनींचेच कार्य पुढे नेण्यासाठी संतांचा जन्म असतो. (उदा. 'आम्ही वैकुंठवासी---'). संतांना साधकावस्था असते. आचार्य जन्मत:च विरागी असतात. परब्रह्माचे व्यावहारिक सत्तेतील स्वरूप म्हणजे संत होय. निरपेक्षता, भगवत्परायणता, शांती, समदृष्टी, निरहंकारता, द्वन्द्वातीतता अशा अनंत गुणराशी धारण करणारा संत होय. तथापि आचार्य आणि संत यांचे जीवनकार्य एकच आहे– धर्मरक्षण!

विद्यारण्यस्वामी थोर आचार्य असून त्यांचा 'पञ्चदशी' हा ग्रंथ अद्वैत तत्त्वज्ञानाचे समग्र विवेचन करणारा आहे.

(अधिक माहितीसाठी पहा– आदित्य प्रतिष्ठान प्रकाशित, भारतीय संप्रदाय पृ. २०८).

* * *


## सवलत योजना

## शङ्कर रामायण

**(वाल्मीकि रामायणावरील मराठी ओवीबद्ध रचना)**





**प्रकाशित तीन खण्ड**

| शङ्कर रामायण | डबलडेमी पृष्ठे | ओवीसंख्या | देणगी मूल्य रुपये |
|---|---|---|---|
| १) बालकाण्ड - | ६५६ | ११,२५४ | ३५०/- |
| २) अयोध्याकाण्ड - | ९६८ | १५,९७२ | ८००/- |
| ३) अरण्यकाण्ड | ६२५ | ७,६४० | ५००/- |
| एकूण | २,२४९ | ३४,८६६ | १,६५०/- |

**तीनही खण्ड एकत्र घेतल्यास**
**सवलत देणगी मूल्य रुपये १,०००/- फक्त**

# विजय योगी आदित्यनाथांचा, रणसंग्राम हिंदुत्वाचा!

– सौ. प्राजक्ता नितीन जोशी



'मैं आदित्यनाथ योगी, ईश्वर की शपथ लेता हूँ कि मैं विधीद्वारा स्थापित भारत के संविधान के प्रति सच्ची श्रद्धा और निष्ठा रखूँगा... शपथ समारोहातील हे वाक्य आपण अनेकदा विविध नेत्यांकडून ऐकले असेल परंतु दुसऱ्यांदा निवडून आलेल्या योगी आदित्यनाथजींनी २५ मार्च २०२२ रोजी जेव्हा दुसऱ्यांदा शपथ ग्रहण केली त्यावेळेस एका विलक्षण जल्लोषात जनसमुदायाने त्यांचे मनापासून स्वागत केले. फक्त तिथे उपस्थित असलेला जनसमुदाय नव्हे! तर दूरदर्शनवरून महाराष्ट्राच्या व इतर राज्यांच्या घराघरातून हा सोहळा पाहणाऱ्या जनतेने त्यांचे मन:पूर्वक स्वागत केले. योगीजींच्या लोकप्रियतेला अशी काय कारणे आहेत याचा छोटासा आढावा आपण या लेखात घेऊया.

आपल्याला ठाऊक आहे की उत्तर प्रदेश हा योगीजींपूर्वी गुन्ह्यांचे केंद्रस्थान बनला होता. असा एकही गुन्हा नाही जो उत्तर प्रदेशात घडलेला नाही. प्रचंड गरिबी, निरक्षरता, स्वास्थ्याकडे दुर्लक्ष, स्त्रियांच्या प्रश्नांकडे बघण्याची उदासीनता, अतिशय हीन दर्जाचे राजकारण व राज्यकर्ते, भरडली जाणारी जनता, अवैधरित्या उभ्या राहिलेल्या झोपडपट्ट्या अशा सर्वांमध्ये उत्तर प्रदेशाची प्रतिमा अत्यंत डागाळलेली होती! २०१४ मध्ये जेव्हा मोदीजी निवडून आले त्यावेळेस त्यांनी सर्वप्रथम अशीच देशभर पसरलेली घाण साफ करायला सुरुवात केली. मग एका अशा नेत्याची गरज होती जो उत्तर प्रदेशाची नाडी योग्य तऱ्हेने हातात घेऊ शकेल. त्यांना एक असा नेता हवा होता जो गुन्हेगारीच्या जगात उलथापालथ करू शकेल व सामान्य जनतेचे प्रश्न नि:स्वार्थ बुद्धीने, समाजकारणी ध्येयाने प्रेरित होऊन सोडवू शकेल.

या महत्त्वाच्या वेळी गोरखपूरच्या भाजपच्या गोटात लोकप्रिय व लोकमान्य असलेल्या संन्याशाने त्यांचे लक्ष वेधून घेतले. ज्यांची राजकारणावर अतिशय चांगली पकड होती, जे सर्व जातीतील जनसमुदायाला आपलेसे वाटत होते व निवडणुकीच्या दरम्यान ज्यांची शिस्तबद्धता व कामाप्रती श्रद्धा मोदीजींना अतिशय भावली होती. २०१७ च्या उत्तरप्रदेश निवडणुकीपूर्वी अमित शाह स्वत: गोरखपूरच्या मठात जाऊन राहिले होते, त्या दरम्यान

त्यांनी योगी आदित्यनाथांची शिस्तबद्ध जीवनशैली, त्यांचे लोकांबरोबरच वागणे, बोलणे, त्यांचा इतिहासाचा प्रगाढ अभ्यास, नि:स्वार्थ वृत्ती हे सर्व अगदी जवळून पारखले. योगीजींनी अतिशय मेहनत घेऊन, गोरखपूरमध्ये घरोघरी जाऊन प्रचार केला, जनतेशी खरोखरचे नाते प्रस्थापित केले, सामान्यांची, महिलांची, गरिबांची, तरुणांची दु:खे जाणून घेऊन टिपून ठेवली.

उत्तर प्रदेशात जातीयवाद प्रचंड मोठ्या प्रमाणावर आहे परंतु त्याचा अडसर योगीजींना कधीच आला नाही कारण त्यांच्या प्रत्येक प्रचाराच्या भाषणांमध्ये, वक्तव्यांमध्ये त्यांनी सर्वसमावेशक वक्तव्य कायम ठेवले. त्यामुळे सर्व जातींमध्ये म्हणजेच यादव, मागासवर्गीय, ब्राह्मण, ठाकूर इ. मध्ये योगींच्या विषयी एक आदर निर्माण झाला. हा माणूस खरंच आपले काही भले करू शकेल असा विश्वास जागृत झाला आणि योगीजींनी तो विश्वास खराही करून दाखवला!

उत्तर प्रदेशाची पूर्व प्रतिमा पाहता कोरोना काळात तिकडे अराजक माजले असते परंतु योगी सरकारने अतिशय निपुणतेने या संकटाची संधी करत कोरोनाचा प्रसार फारसा होऊ न देण्यासाठी काम केले. खरंतर उत्तर भारतीयांचे लोंढेच्या लोंढे देशातील वेगवेगळ्या भागांतून आपल्या घरी परत यायला निघाले होते. जवळजवळ ४० लाख कामगार उत्तर प्रदेशात कोरोना काळात परतले. त्या दरम्यान योगी सरकारने त्यांच्यासाठी मोफत बस सेवा सुरू केली, आजारी लोकांसाठी रुग्णवाहिकांची सोय लावली. परतलेल्या लोकांना गावाच्या वेशीवर शाळांमध्ये, सभागृहांमध्ये विलगीकरणात ठेवले, त्यांच्या खाण्यापिण्याची, राहण्याची, औषधांची सोय लावली व १४ दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यावर आपापल्या गावी जायला दिले. यातही आपल्या लोकांना पुन्हा नोकरीसाठी इतर राज्यांमध्ये जायला लागू नये म्हणून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यासाठी त्यांचा एक डाटाबेस या काळात बनविण्यात आला, म्हणजे संधीचे सोने केले!

उत्तर प्रदेशात कोरोना न पसरण्याचे अजून एक महत्त्वाचे कारण म्हणजे दररोज ४ लाखांहून अधिक लोकांच्या चाचण्या तेथील आरोग्य विभाग कर्मचारी करत होते. त्यामुळे कुठल्याही संशयित रुग्णाला ताबडतोब विलगीकरण व उपचार मिळण्यास मदत झाली व संसर्ग थांबला! त्याच दरम्यान ऑक्सिजनची उणीव देशभर भासू लागली परंतु योगी सरकारने आधीच ५०० हून अधिक ऑक्सिजन प्लांट्सची सोय इस्पितळांमधून व वैद्यकीय महाविद्यालयांमधून करून ठेवली होती. कौतुकाची बाब म्हणजे उत्तर प्रदेश हे एकमेव राज्य होते जे एका दिवसाला ३८ लाख लसीकरण करत होते.

२०१७ मध्ये योगीजी पहिल्यांदा मुख्यमंत्री बनले. २०१७ पर्यंत अखिलेश यादवच्या राज्यात उत्तरप्रदेश राज्य सर्व प्रकारच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये पहिल्या वा दुसऱ्या स्थानावर होते. याशिवाय करोडोंचे घोटाळे, अफरातफर, गंभीर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, समाजविरोधी घटकांचे वाढते प्रमाण, गावगुंडांचा उच्छाद व त्यांना मदत करणारे भ्रष्ट राजकारणी, सहजरित्या गुन्हा करून मोकळे फिरणारे गुन्हेगार अशा एक ना अनेक समस्या अखिलेश यादवच्या कारकिर्दीत उत्तरप्रदेशाची प्रतिमा भ्रष्टवत होत्या. यासाठी खोलवर उतरून या अत्याचार, भ्रष्टाचाराचे निर्मूलन करणाऱ्या मुख्यमंत्र्यांची गरज होती. योगी आदित्यनाथांच्या भाषणातून ते हे करू शकतील असे लोकांना वाटले आणि म्हणूनच २०१७ मध्ये जनतेने प्रचंड लोकमताने योगी आदित्यनाथांना निवडून आणले!

गुन्हेगारी रोखण्यासाठी योगीजींनी सर्वप्रथम रोजगार वाढवला, मेक इन इंडिया अंतर्गत तरुणांना चांगले काम सुरू करण्यासाठी प्रोत्साहन व निधी

दिला. राज्याची न्याय व सुव्यवस्था कसून बांधली. भ्रष्ट पोलीस अधिकारी, पुढारी, आमदार, खासदार यांना प्रथम वेसण घातले, काहींना निलंबित केले. महिलांच्या सुरक्षेसाठी योगीसरकारने अँटी रोमिओ स्क्वाड, UP-122 अॅप, रात्र सुरक्षा योजना, मिशन शक्ती, पिंक बूथ इ. अनेक पर्याय सुरू केलेत आणि त्याचे योग्य नियोजन व व्यवस्था स्थानीय पोलीस व त्यांच्यासोबत 'स्वयं सहायता समूह' नावाची संस्था पाहत आहे.

अवैध गो-हत्या प्रकरणांत योगीसरकारने फार मोठे कार्य केले आहे. अनेक अवैध कत्तलखान्यांवर कारवाई करून यामागे कार्यरत असलेल्या मोठ्या टोळीला त्यांनी जेरीस आणले आहे. समर्थ रामदास स्वामींच्या ओवीप्रमाणे, 'धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट । खटनटासी खटनट । अगत्यकरी ।।' (दासबोध १९.९.३०). इ. स. २०२२ मध्ये योगीजी जेव्हा परत निवडून आले त्या एक महिन्याच्या कालावधीत जवळपास ५० गुन्हेगारांनी स्थानीय पोलिसांकडे आत्मसमर्पण केले! योगीजींची 'बुलडोझरबाबा'ची प्रतिमा चांगलीच चर्चेत आहे. याचे कारण म्हणजे १०० बिघांहून अधिक (१ एकर = १.६२ बिघा) असलेल्या वनखात्याच्या जमिनींवर अवैधरित्या केलेले बांधकाम योगीजींच्या आदेशावरून जमीनदोस्त करण्यात आले. ही जमीन एका मुसलमान धर्मगुरूची होती! याशिवाय दिल्लीमध्ये २.१० एकरावर अवैधरित्या वास्तव्य करून असलेल्या रोहिंग्यांच्या झोपड्यांवर रातोरात कारवाई करून बुलडोझरने सफाई केली. ही १५० करोडची जमीन सिंचन खात्याची होती. खरंतर अशी अनेक उदाहरणे आहेत ज्यात अवैधरित्या अतिक्रमण केलेल्या इमारतींवर बुलडोझर बाबांनी साफसफाई केली आहे!

अशाच पद्धतीने उत्तरप्रदेशातील सर्व गुन्हेगारांवर कडी पाळत ठेवून, ताबडतोब न्यायव्यवस्था मार्गी लावून, त्यांना योग्य ती शिक्षा देण्याची प्रक्रिया युद्धस्तरावर सुरू केली. यामुळेच गुन्हेगारीच्या दरात कमालीची घट पाहायला मिळाली!




| Crime | 2014 | 2015 | 2016 | 2017 | 2018 | 2019 | 2020 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Rape | 3,467 | 3,025 | 4,816 | 4,246 | 3,964 | 3,065 | 2,769 |
| Murder | 5,150 | 4,732 | 4,889 | 4,324 | 4,018 | 3,806 | 3,779 |
| Theft | 48,380 | 49,491 | 56,550 | 60,434 | 55,614 | 50,197 | 33,250 |

अर्थात या सगळ्यात योगीजींबरोबर स्थानिक पोलीस, पुढारी मंडळी, जिल्हाप्रमुख, समाज स्वास्थ्यासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था इ. चे योगदान कौतुकास्पद आहे! म्हणजेच जर योग्य सरकार, योग्य वेळी जनतेला न फसविता खुर्चीवर आले आणि सुयोग्य बांधणी करत राज्याचा कारभार हाती घेतला तर किती फरक पडतो हे उत्तरप्रदेश मॉडेलवरून आपल्या लक्षात येते!

योगीजींच्या एका बहुचर्चित भाषणानंतर बॉलीवुडमध्ये बरीच उलथापालथ झाली. मध्यंतरी २०२१ मध्ये 'तांडव' नावाची वेबसिरीज नेटकऱ्यांमध्ये प्रसिद्ध झाली होती. त्यातील काही आक्षेपार्ह मुद्दे असे होते की, हिंदू देवदेवतांचे वेष परिधान करून एका (कु)प्रसिद्ध महाविद्यालयातील विद्यार्थी अर्वाच्य भाषेत नाट्य सादर करतात, दुसरे म्हणजे मालिकेतील पंतप्रधानाचे पात्र अतिशय अपमानास्पद पद्धतीने रंगविण्यात आले होते, विविध जातींमधील तेढ वाढविण्यासाठी प्रक्षोभक संवाद लिहिले होते. प्रसार माध्यमांना हिंदूंच्या विरोधात काही दाखवले की चेवच चढतो त्यामुळे या मालिकेला मोठा प्रतिसाद मिळाला. त्याच्या प्रसिद्धीचे कारण

त्यात दाखवलेल्या हिंदूंच्या विरोधातील आक्षेपार्ह वक्तव्यांमुळे आणि पात्रांमुळे! योगीजींनी या मालिकेच्या संपूर्ण समूहाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले, रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला. यादरम्यान त्यांनी महाराष्ट्र सरकारला बऱ्याच कानपिचक्या दिल्या परंतु आपल्याकडे याविरुद्ध काहीही कारवाई झाली नाही! बॉलीवुडचे 'हिरवेकरण' हा खरतर खूप वर्षांपासून चालत आलेला कळीचा मुद्दा आहे परंतु योगी आदित्यनाथ पहिले मुख्यमंत्री आहेत ज्यांनी याविरुद्ध बंड पुकारले. आज अनेक निर्माते त्यांना घाबरून असतात!

समर्थ म्हणतात त्याप्रमाणे, 'सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करेल तयाचे । परंतु येथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥' (दासबोध २०.४.२६) या ओवीला योग्य असे काशी विश्वनाथाचे अधिष्ठान सुस्थापित करून योगीजींनी सनातन हिंदू धर्माची पुनर्स्थापना उत्तरप्रदेशात केली! २६ जून २०२१ रोजी योगी आदित्यनाथांनी प्रधानमंत्री मोदीजींसमोर 'अयोध्या-संभावित व्हिजन डॉक्युमेंट' सादर केले. या अंतर्गत पौराणिक महत्त्व असलेले जलाशय व कुंडांचे नूतनीकरण व संरक्षण योजना, इंटेलिजन्ट ट्राफिक मॅनेजमेंट प्रणाली, सौर ऊर्जेचा शहरामध्ये वापर, वाल्मीकि रामायण युगात असलेले ८८ विविध जातींचे २७ हजार वृक्षरोपण करण्यासाठीचा आराखडा, जवळजवळ १२ लाखांहून अधिक रोजगार संधी, अयोध्येला 'वैदिकनगर' म्हणून पुनर्प्रस्थापित करण्याचा आराखडा ज्यात अयोध्येप्रती असलेली आस्था व सनातन परंपरा जतन करण्यासाठी, अयोध्या एक आध्यात्मिक केंद्र म्हणून जगासमोर आणण्याचा विकास आराखडा उपस्थित करण्यात आला. याशिवाय अयोध्येतील तीर्थपर्यटन वृद्धिंगत व्हावे यासाठी वेगवेगळे छोटे मोठे प्रकल्प ज्यातून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल असे उभे करण्यात योगी सरकारला यश मिळाले आहे.

याशिवाय 'श्रीराम आंतरराष्ट्रीय हवाईअड्डा', भव्य प्रवेशद्वार, आंतरराष्ट्रीय संग्रहालय यांचे विकास प्लॅन्स देखील सादर करण्यात आले. या अयोध्यानगरीत योगीजींच्या आराखड्यानुसार ग्रीन फिल्ड टाउनशिप उभारण्याचा प्रयत्न सुरू आहे, ज्यात मठ, आश्रम, गेस्ट हाऊस, इस्पितळ, शाळा, राहण्याची सोय इ. गोष्टींचा समावेश आहे. ज्याप्रमाणे आपण वैश्विक संत विद्यापीठाचे स्वप्न बाळगून आहोत व त्याचे साक्षीदार आहोत, त्याचप्रमाणे आपण प्रभू श्रीरामांचे भव्य मंदिर व अयोध्या नगरी देखील उभी राहताना याचि देही याचि डोळा पाहणार आहोत!

फक्त 'हिंदू साधू' किंवा 'हिंदू योगी' म्हणून ओळख असलेल्या योगीजींनी त्यांच्या ५ वर्षांच्या कारकिर्दीत गुन्हेगारीला वेसण घालून क्षत्रियधर्म पाळला, कोरोनाच्या भयानक काळात लोकांना आश्रय देऊन, त्यांचे आरोग्य सुधारून राजधर्म सांभाळला. भारताचे धर्मविभूषण असलेल्या काशीचा चेहरा पालटून व अयोध्या नगरीत प्रभू श्रीरामांच्या मंदिराचे पुनर्निर्माण करण्याची शपथ घेऊन सनातन धर्म पुनर्प्रस्थापित केला! अशा या कर्मनिष्ठ योगी पुरुषाला आमचा मानाचा मुजरा व सादर वंदन! मोदीजींसारखे भारताचे नेतृत्व योगीजींसारखाच बलाढ्य महंत करू शकेल यात संदेह नाही!

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

* * *



# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव - सद्यस्थिती आणि अपेक्षा

– श्री. केदार केळकर



भारताच्या स्वातंत्र्याला येत्या १५ ऑगस्ट रोजी ७५ वर्षे पूर्ण होणार आहेत. गेल्या ७५ वर्षातील सर्वात महत्त्वाचे आणि उल्लेखनीय राष्ट्रीय यश म्हणजे संपूर्ण काश्मीरवर भारताचे प्रभुत्व प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने पुढे टाकलेले पाऊल. काही जणांच्या मते बांगलादेश निर्मिती हे सर्वात मोठे यश आहे. परंतु हिंदूंची हत्या करणारा आणि आपल्याऐवजी चीनला जवळ करणारा बांगलादेश बघितला की त्याच्या निर्मितीला राष्ट्रीय यश म्हणता येत नाही. फार तर ते तत्कालीन सरकारचे मोठे यश म्हणता येईल. म्हणून ३७० कलम रद्द होणे हेच सर्वात मोठे राष्ट्रीय यश मानावे लागते आणि त्याचे श्रेय सध्याच्या केंद्र सरकारला दिले पाहिजे. या पार्श्वभूमीवर अमृतमहोत्सवी वर्षामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व भारतीयांना जो प्रश्न विचारला आहे, त्याचा विचार करावा लागेल.

पंतप्रधान आपल्याला विचारत आहेत की, 'स्वातंत्र्याला जेव्हा १०० वर्षे पूर्ण होतील तेव्हा भारताचे चित्र कसे असले पाहिजे किंवा तुम्हाला पहायला आवडेल?' यावर विचार करताना काही जणांनी जुन्या अखंड भारताचे चित्र रंगवले आहे. भावनिकदृष्ट्या ते चांगले दिसत असले तरी बदललेल्या जागतिक परिस्थितीत ते व्यवहार्य नाही. तसेच दुसऱ्याचे राज्य बळकावणे ही भारतीय संस्कृती नाही. उदा. श्रीरामांनी वालीचा, रावणाचा वध करून त्यांचे राज्य त्यांच्या भावांना दिले. कारण भारताचा राष्ट्रवाद हा राजकीय नसून सांस्कृतिक आहे आणि तो विश्वकल्याणासाठी आहे. 'कृण्वन्तो विश्वं आर्यं' (जगाला सुसंस्कृत बनवूया) ही आपल्या पूर्वजांची प्रतिज्ञा होती. मानवजातीवर राजसत्ता कोणाचीही असली, मनुष्याचे बहिरंग कसेही असले तरी त्याचे अंतरंग भारतीयच असावे, हे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले होते. मोदीजी देखील भारताला विश्वगुरु बनवण्याचे ध्येय डोळ्यापुढे ठेवून काम करत आहेत. भारत विश्वगुरु बनण्याच्या वाटचालीतला सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे स्वयंपूर्णता किंवा आत्मनिर्भरता. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आली तरी अनेक बाबतीत देश परावलंबी आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणताही देश कायमचा मित्र नसतो. त्यामुळे परावलंबित्व देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घातक असते असा अनेक देशांचा अनुभव आहे. ती वेळ आपल्यावर येऊ नये म्हणून भारत प्रत्येक क्षेत्रात आत्मनिर्भर बनलेला पाहणे हेच आपले स्वप्न असले पाहिजे.

भारत आत्मनिर्भर व्हावा यासाठीच काम करणारा, अहोरात्र नागरिकांच्या भविष्याचा विचार करणारा आणि त्यांना विचारप्रवृत्त करणारा पंतप्रधान मिळणे

हे आपले महद्भाग्य आहे. देशाचे नेतृत्व आपल्या भविष्याचा विचार करत असेल तर आपणही देशाचा विचार केला पाहिजे आणि राष्ट्राच्या पुनर्बांधणीची यथाशक्ती जबाबदारीही घेतली पाहिजे. कारण **लोकशाही हवी पण राष्ट्रउभारणीची जबाबदारी मात्र नको असे चालत नाही.**

देश आत्मनिर्भर होण्यासाठी आधी नागरिकांना आत्मनिर्भर व्हावे लागेल. 'आत्मनिर्भरता' म्हणजे आपले सरकारवरील अवलंबित्व कमी करणे. याची सुरुवात शिक्षण क्षेत्रापासून करावी लागेल. कारण सध्याची शिक्षणव्यवस्था ब्रिटीशकालीन आहे आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्यात बदल झालेला नाही. आजही आपण काय शिकायचे, हे सरकार ठरवते. राजेशाहीच्या काळात देखील शिक्षणक्षेत्र राजसत्तेच्या हातात नव्हते. आता तर आपण लोकशाहीत राहतो आणि लोकशाहीच हवी असे म्हणतो तर मग शिक्षण क्षेत्र सरकारच्या हातात कशाला? सुदैवाने शाळा-महाविद्यालयात गेलेच पाहिजे असा काही कायदा/नियम नाही. तसेही हल्लीचे शिक्षण म्हणजे फक्त पदवी/पदविका मिळवणे एवढाच मर्यादित अर्थ आहे. असे असताना एकच अभ्यासक्रम शाळा-महाविद्यालय आणि खाजगी शिकवण्या अशा दोन ठिकाणी शिकण्याचे प्रयोजन काय? आणि एवढे करूनही तथाकथित सुशिक्षित मनुष्य कामाच्या ठिकाणी गेल्यावर त्याला नव्याने प्रशिक्षण द्यावे लागते असा सार्वत्रिक अनुभव आहे. मग मुलांनी पालकांचे लक्षावधी रुपये खर्च करून, प्रसंगी कर्ज काढून घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग काय? आपली अंगभूत गुणवत्ता लक्षात घेऊन योग्य व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला हवे ते शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य आपल्याला असले पाहिजे. ज्यांना सरकारमान्य शिक्षणच घ्यायचे असेल त्यांनी घरीच अभ्यास करून आणि अगदी आवश्यक असेल तेवढ्यापुरते खाजगी शिकवणी वर्गात जाऊन तथाकथित शिक्षण घेणे योग्य होईल. तसे केल्यास पुष्कळ वेळ आणि त्रास वाचेल. वाचलेल्या वेळात धर्म-संस्कृती, (आजवर दडवला गेलेला) इतिहास, रोजच्या जगण्यात उपयोगी पडणारे विषय तसेच संस्कृत भाषा यांचे शिक्षण घेता येईल. संगणकासाठी संस्कृत ही सर्वात योग्य भाषा असल्याचे सिद्ध झाले आहे.

ब्रिटीशपूर्व काळात शिक्षण सर्वांना मोफत व तरीही उच्च दर्जाचे होते. इतिहास संशोधक व गांधीवादी विचारवंत कै. धर्मपाल 'द ब्युटीफुल ट्री' या पुस्तकात लिहितात, ब्रिटिशांनी लादलेल्या गुलामगिरीमुळे भारत जरी नि:सत्व आणि कंगाल होऊ लागला होता तरीही भारतीय शिक्षणपद्धतीची गुणवत्ता, तिचा प्रसार, श्रेष्ठ अभ्यासक्रम हे सगळे पैलू इंग्लंडमधील शिक्षणव्यवस्थेपेक्षा सकस आणि उजवे होते. भारतातील शाळांची संख्या, विद्यार्थ्यांची संख्या, अभ्यासक्रमाची विविधता आणि सखोलता या गोष्टी इतक्या विलक्षण आणि अविश्वसनीय होत्या की, ब्रिटीश अधिकारी भांबावूनच गेले. जुने दिवस पुन्हा आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक यासारख्या खऱ्याखुऱ्या शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षण मातृभाषेतूनच घ्यावे असे म्हटले आहे. घरच्या घरी मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास पुष्कळ पैसा वाचेल. तो पैसा साठवून, योग्य ठिकाणी गुंतवून त्या पैशात एखादा उद्योग-व्यवसाय सुरू करून मुलाला/मुलीला खऱ्या अर्थाने स्वत:च्या पायावर उभे करता येईल. हे करण्यासाठी ब्रिटिशांनी डोक्यात भरवलेले नोकरीचे खूळ काढून टाकणे आवश्यक आहे. जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीला सरकारने नोकरी द्यावी किंवा निर्माण करावी ही अपेक्षा अवास्तव आहे. कारण जगातील कोणत्याही देशाच्या सरकारला ते जमलेले नाही. तसेच नोकरीच्या संधी निर्माण होण्यात फायदा दिसत असला तरी तो तत्कालिक स्वरूपाचा असतो आणि त्याचे दीर्घकालीन नुकसान मात्र कित्येक

पटींनी अधिक असते. औद्योगिक उत्पादनांची व विजेची वाढीव मागणी पूर्ण करण्यासाठी प्रदूषण वाढवणारे नवनवीन प्रकल्प उभारावे लागतात. त्यासाठी अब्जावधी रुपयांचे भांडवल लागते. अनेक वर्षांपासून देश कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला असल्याने सरकार भांडवल पुरवू शकत नाही. त्यासाठी खाजगी किंवा परदेशी कंपन्यांचे पाय धरावे लागतात. त्यांच्या जवळजवळ सगळ्या अटी आणि शर्ती सरकारला मान्य कराव्या लागतात. त्यांना जमीन द्यावी लागते. ही जमीन नेहमी शेतकऱ्यांचीच असते. त्यामुळे देशातली शेतजमीन कमीकमी होत जाते. ब्रिटिशपूर्व काळात नोकरी करणे हे कमीपणाचे मानले जात असे. कारण नोकर बनणे हे शिक्षणाचे यश नसून अपयश आहे. ज्याला स्वतंत्र उद्योग-व्यवसाय करणे खरोखरच शक्य नाही तेच फक्त नोकरी करत असत. ते दिवस पुन्हा आणण्यासाठी पती-पत्नींनी वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी करण्याऐवजी दोघांनी मिळून स्वतंत्र उद्योग-व्यवसाय सुरू करावा. त्यात आपले कुटुंबीय, नातलग, मित्र यांना सहभागी करावे. अशा कौटुंबिक किंवा लघुउद्योग-व्यवसायाचे बरेच फायदे आहेत.

उदा. १) सर्वसाधारणपणे असे दिसते की, नोकरीमध्ये मनुष्य पगार व अन्य लाभांवर डोळा ठेवून काम करतो. कामाची आवड, मालकाचा नफा-तोटा हे मुद्दे गौण असतात. तोच मनुष्य आपल्या आवडीचा स्वतंत्र उद्योग-व्यवसाय करू लागल्यास त्याची मानसिकता बदलेल. तो अधिक मेहनती व जबाबदार बनेल.

२) कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला रोजगाराची हमी मिळेल आणि ठराविक वयाला निवृत्तीची सक्ती असणार नाही. पगारी माणसांवर अवलंबित्व कमी असेल.

३) घरातल्या मुलांना उद्योग-व्यवसायाचे प्रशिक्षण व अनुभव लहानपणापासून मिळेल. घरातच शिक्षण मिळाल्यामुळे तंत्रशिक्षणावर होणारा खर्च वाचेल किंवा कमी होईल. ५२% गुणवत्ता अनुवंशिक असल्यामुळे मुलांचा कौशल्यविकास लवकर व अधिक चांगला होईल. वेळेची आणि साधनसंपत्तीची नासाडी कमी होऊन संख्यात्मक व गुणात्मक अशी दोन्ही प्रकारची उत्पादकता वाढेल.

४) कुटुंबातील प्रत्येक जण आपलेपणाने काम करेल. कामचुकारपणा करणे, वीकेंडची आतुरतेने वाट बघणे किंवा नियमानुसार मिळते म्हणून कारण नसताना सुट्टी घेणे असे प्रकार होणार नाहीत. साहजिकच कामाचे तास वाढवण्यासाठी कोणताही अतिरिक्त मोबदला द्यावा लागणार नाही.

स्वतंत्र उद्योग-व्यवसाय करू पाहणाऱ्या कुटुंबांना प्रोत्साहन मिळेल असे पोषक वातावरण निर्माण केले पाहिजे. जाहिरातीतली महागडी उत्पादने, सेवा घेण्याऐवजी लघुउद्योगांचीच उत्पादने, सेवा घेण्याला प्राधान्य द्यावे. उद्योग आणि ग्राहक यांच्यात थेट संबंध प्रस्थापित झाल्यास किंमत तर कमी राहीलच शिवाय सेवा-उत्पादनात ग्राहकाच्या मागणीप्रमाणे बदल करणे सोपे होईल.

आपले सरकारवरील अवलंबित्व कमी करण्याचा एक उपाय म्हणजे खाजगीकरण. गेल्या काही महिन्यांपासून सरकारीकरण की खाजगीकरण हा वाद सुरू आहे. सरकारीकरणात भ्रष्टाचाराचा धोका आहे तर खाजगीकरणात लुबाडणूक-फसवणुकीचा. दोन्ही पर्याय सदोष असल्यामुळे जो पर्याय अधिक व्यवहार्य असेल तो निवडावा लागेल. लोकांच्या सरकारकडून देशाच्या सीमांचे रक्षण करणे, दहशतवाद-नक्षलवाद संपवणे, आपले शेजारी देश चीनच्या कह्यात जाऊ नयेत म्हणून त्यांना आर्थिक व अन्य प्रकारची मदत करणे, पायाभूत प्रकल्प उभारणे, सर्व प्रकारची वाहतूक व्यवस्था सांभाळणे, विमा कंपन्या चालवणे, बुडणाऱ्या बँकांना वाचवणे, नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत करणे, शेतकऱ्यांना हमीभाव आणि कर्जमाफी देणे, मोफत/स्वस्तात शिक्षण व अन्नधान्य देणे, (योग्यता न पाहता)

सरकारी नोकऱ्या देणे, देशाच्या कानाकोपऱ्यात गॅस सिलेंडर, वीज व पाणी पोहोचविणे या व अशा असंख्य अपेक्षा आहेत. देशाची लोकसंख्या सुमारे १३५ कोटी आहे आणि ती वाढणार आहे. अशा महाकाय देशात सर्व काही सरकारने करायचे म्हटले तर (आज आणि भविष्यात) किती पैसा लागेल याचा अंदाज बांधणे अशक्य आहे. सध्या सरकारी तिजोरीत जो कर जमा होतो त्यातला बराचसा भाग लोकप्रतिनिधी व सरकारी बाबूंचे वेतन-भत्ते आणि इतर कार्यालयीन खर्च भागवण्यात संपतो. त्यामुळे विधायक कामांसाठी निधी अपुरा पडतो. सरकारने आणखी कर लादला तो किती जण भरतील? करांचा वाढीव बोजा कोणालाच नको असल्याने सरकारीकरणाचा आग्रह धरणे हे हास्यास्पद आणि अव्यवहार्य आहे. अशा परिस्थितीत सरकारने आपल्यावरची जबाबदारी कमी करणे हाच उपाय आहे. परंतु हे समजून घेता सरकारीकरणच फायद्याचे आहे असे मानणारा फार मोठा वर्ग आपल्या समाजात आहे. ही गोष्ट काही स्वार्थी नेत्यांनी अचूक हेरली आहे. या नेत्यांनी मोफत/स्वस्त वीज, पाणी, धान्य अशी अनेक प्रलोभने दाखवून, लोकप्रियता मिळवून देशाची सत्ता हातात घेण्यासाठी कंबर कसली आहे आणि दुर्दैवाने त्यांना काही प्रमाणात यश देखील मिळत आहे. या नेत्यांचा अंतस्थ हेतू शुद्ध नाही, किंबहुना ते देशाची सुरक्षा धोक्यात आणत आहेत अशी विश्वसनीय माहिती गुप्तचर यंत्रणांना मिळाली आहे. आळशी, ऐतखाऊ, परावलंबी बनणे किती घातक आहे, याचा अनुभव आपण पूर्वी एकदा घेतला आहे.

ब्रिटिशांनी तत्कालीन संस्थानिकांना सेना, शस्त्रास्त्रे, प्रशिक्षण मोफत दिले आणि ते परावलंबी झाल्यावर योग्य वेळ येताच एकेक संस्थान खालसा करत संपूर्ण भारत ताब्यात घेतला. संस्थानिकांनी केलेल्या चुकीची पुनरावृत्ती होता कामा नये. आपण विविध प्रलोभनांना बळी पडलो तर क्षणिक सुखासाठी प्रचंड रकमेचे आंतरराष्ट्रीय कर्ज काढावे लागेल आणि देशाची सुरक्षितता धोक्यात येईल. पारतंत्र्यामध्ये भौतिक आणि पारमार्थिक अशी दोन्ही प्रकारची उन्नती खुंटते. स्वातंत्र्य आणि स्वयंपूर्णता अनिवार्य आहे, हे समर्थ रामदासांनी अचूक ओळखले होते. म्हणून ऐतखाऊ, परावलंबी लोकांना उद्देशून समर्थ दासबोधात म्हणतात, 'काही मेळवी मग जेवी' (११.३.२५), आधी कष्ट मग फळ, साक्षेपेविण केवळ वृथापुष्ट (ऐतखाऊ) (११.१०.२०), जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला (१९.९.१६). दासबोधातील ही वचने पुरेशी बोलकी आहेत.

तात्पर्य, सरकारीकरणाच्या आडून स्वार्थ साधू पाहणाऱ्या आणि लोकांना आळशी, ऐतखाऊ, परावलंबी बनवणाऱ्या नेत्यांना कायमचे घरी बसवले पाहिजे.

देशापुढील एक महत्त्वाची समस्या म्हणजे आयात करावे लागणारे इंधन आणि त्याची दरवाढ. ही राष्ट्रीय समस्या असल्याने यावर तोडगा काढण्याची जबाबदारी एकट्या सरकारची नाही. खाजगी वाहने आणि इतर सर्वच आयात कराव्या लागणाऱ्या वस्तूंचा गरजेपुरता वापर केल्यास करांचा बोजा तर कमी होईलच शिवाय प्रदूषणही कमी होईल. तसेच पर्यायी उर्जेवर चालणाऱ्या वाहनांचा वापर करणे हा देखील उपाय आहे. इंधन दरवाढीला जशी आंतरराष्ट्रीय करणे आहेत तशीच देशांतर्गत कारणे देखील आहेत. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे २००४ ते २०१४ या काळात केंद्र सरकारने पेट्रोल, डिझेलच्या किंमती खाली ठेवण्यासाठी अंबानी-अदानी यांच्याकडून १,४४,००० कोटी रुपये दीर्घ मुदतीचे कर्ज काढले होते. सध्याच्या केंद्र सरकारला त्याची व्याजासह परतफेड करण्यासाठी ३,२२,००० कोटी रुपये उभारावे लागणार आहेत. त्यामुळे इंधन महागणे अपरिहार्य आहे. कारण इंधन दरवाढ ही बहुतांशी करवाढ आहे. असे

असले तरी इंधनावरील कर हा आयकरमुक्त शेतकरी, करबुडवे व्यापारी अशा सर्वांनाच भरावा लागत असल्याने कोणावर अन्याय होण्याचा प्रश्न नाही. इंधनावरील कर आणि वस्तू-सेवा कर ही अप्रत्यक्ष कराची वसुली जितकी अधिक तितकी भविष्यात आयकर कमी होण्याची शक्यता अधिक. म्हणून सर्वाधिक आयकर भरणाऱ्या मध्यमवर्गीय लोकांना अप्रत्यक्ष करवाढ स्वागतार्ह वाटली पाहिजे. खरंतर सरकारला कर देऊन आपण काही उपकार करत नाही. कारण संपत्तीचा उपभोग घेण्यापूर्वी ती शुद्ध करून घेणे आवश्यक असते. संपत्तीची शुद्धी होण्यासाठी ती कशी खर्च करावी याविषयी धर्मशास्त्राने सुस्पष्ट मार्गदर्शन केले आहे.

धर्मशास्त्राने सांगितलेला प्राधान्यक्रम असा :

**धर्मासाठी –** धर्म टिकला तरच हे सृष्टीचक्र टिकेल. प्रत्येक संकटाच्या काळात आपली देवस्थानेच कशी मदतीला धावून येतात ते आपण पाहतो. म्हणून संपत्तीचा वापर सर्वात आधी धर्माचे रक्षण व संवर्धन यासाठी करावा. 'येथून वाढला धर्मु । रमाधर्म समागमे ।।' असे समर्थ रामदासांनी म्हटलेच आहे.

**राष्ट्रासाठी :** प्राचीन काळी आपण वैभव संपन्न होतो. पण राष्ट्र पराभूत झाले आणि आक्रमकांनी सर्व संपत्ती लुटली. सोन्याचा धूर निघत असलेली घरे भिकेला लागली. तात्पर्य, राष्ट्राच्या यशातच आपले यश सामावले असल्याने राष्ट्रकार्यासाठी योगदान द्यावेच.

**आप्तस्वकीयांसाठी :** आपले नातेवाईक, मित्रपरिवार, घरात व कार्यालयात काम करणारे सेवक यांच्या अडचणी, गरजा ओळखून त्यांना वेळोवेळी मदत करणे.

**भविष्यासाठी :** धर्म, राष्ट्र आणि आप्तस्वकीय यासाठी खर्च करून जी रक्कम शिल्लक राहील त्यातला काही भाग भविष्याची तरतूद म्हणून योग्य ठिकाणी गुंतवावा.

**उपभोगासाठी :** या सर्वातून जो पैसा उरेल तो गरजा भागवण्यासाठी व मौजमजा करण्यासाठी उपयोगात आणावा.

**यालाच भागवताने 'धर्माय, यशसे, स्वजनाय, अर्थाय, कामाय' अशा क्रमाने संबोधिले आहे.**

संपत्तीचा विनियोग अशा प्रकारे केल्यास अनावश्यक खर्चाला तर आळा घातला जाईलच शिवाय गरजू लोकांना सरकारवर अवलंबून राहावे लागणार नाही आणि आपसूकच भ्रष्टाचाराला वाव मिळणार नाही. जोपर्यंत बहुसंख्य लोक संपत्तीचा विनियोग वरील क्रमाने करत होते तोपर्यंत भारताचे वैभव टिकून होते. काळाच्या ओघात प्राधान्यक्रम उलटा झाला. सगळ्या भौतिक गरजा भागल्यानंतर मी धर्माचा व राष्ट्राचा विचार करेन असे म्हणणाऱ्या माणसाला भगवद्गीतेने चोर म्हटले आहे. स्वार्थीपणाने केलेला धनसंचय माणसाला सुख तर लाभू देत नाहीच शिवाय त्याच्या नंतरच्या पिढीला धर्माची ग्लानी आणतो. गेल्या काही वर्षात भारताचे नेमके हेच झाले आहे. २००४ ते २०१४ या काळात इंधन तुलनेने स्वस्त असले तरी त्याचा दुष्परिणाम असा झाला की, देशाच्या संरक्षणासाठी पैसे नाहीत असे तत्कालीन संरक्षण मंत्री ए. के. अँटनी लोकसभेत म्हणाले होते तर 'पैसे झाडाला लागत नाहीत' असे हतबल उद्गार तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी काढले होते. सध्याच्या केंद्र सरकारने एकही घोटाळा तर केलेला नाहीच उलट आपण भरलेल्या कराचा प्रत्येक रुपया देशाच्या हितासाठीच वापरला आहे. उदा. आज आयात करावी लागणारी बहुतांश संरक्षण सामग्री भविष्यात भारतीय बनावटीची असणार आहे.

इतकेच नव्हे तर देशाच्या इतिहासात प्रथमच भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांना परदेशांकडून मागणी होत आहे. (तसेच यंदा भारताची एकूण निर्यात ४०० अब्ज डॉलर झाली आहे.) सुरक्षिततेच्या बदल्यात स्वस्ताई हवी आहे की महागाईच्या बदल्यात सुरक्षितता, असा प्रश्न आपल्यापुढे आहे. काश्मिरी

हिंदूंकडे पाहिले की या प्रश्नाचे बरोबर उत्तर मिळते. कारण ते सर्व जण श्रीमंत होते, सर्व प्रकारचे भौतिक सुख उपभोगत होते. परंतु त्यांचे स्वसंरक्षणाकडे दुर्लक्ष झाले आणि आपल्याच मायभूमीतून पळ काढण्याची वेळ आली. म्हणून राष्ट्रीय सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे आणि त्यासाठी कर भरावा लागला तर तो भरणे अनिवार्य आहे. तरीही कर भरण्याला विरोध असलाच तर जी राज्य सरकारे विविध घोटाळे करतात त्यांच्याकडे कर कमी करण्याची मागणी करावी. कारण देशाला मिळणाऱ्या करांच्या उत्पन्नात त्यांचाही वाटा असतोच.

अर्थव्यवस्था हा बहुसंख्य लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. प्राचीन काळी भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान होती आणि शेती ही प्राधान्याने गायीवर अवलंबून होती. ज्यांच्याकडे शेती नव्हती किंवा पुरेशी नव्हती त्यांचा चरितार्थ गायीवर अवलंबून होता. म्हणून भारतीय अर्थव्यवस्था गोप्रधान होती असे म्हणणे अधिक योग्य होईल. आजही भारतात अत्यल्प प्रमाणात का होईना पण गायींवर आधारित शेती करणारे शेतकरी आहेत. स्वातंत्र्यानंतर गोहत्याबंदी विधेयक संसदेत मंजुरीसाठी आले होते. सर्वपक्षीय (म्हणजे मुस्लीम खासदारांचासुद्धा) पाठिंबा असल्याने ते मंजूर झाले असते. पण नेहरूंनी ते मंजूर होऊ दिले नाही. १९६६ साली शेकडो साधूंनी गोहत्याबंदीसाठी बलिदान दिले. २००५ साली सर्वोच्च न्यायालयाने गायीची उपयुक्तता मान्य करून गोहत्याबंदीच्या बाजूने निकाल दिला आहे. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने २००७ साली दिलेल्या अहवालात गोमूत्रामध्ये २४ औषधी घटक असतात, असे म्हटले आहे. तरीही गोहत्याबंदीला अकारण धार्मिक रंग दिला जातो. तान्ह्या मुलाला आईचे दूध पुरत नसेल तर गायीचे दूध दिले जाते. कारण ते अन्य कोणताही पदार्थ पचवू शकत नाही. म्हणून गायीला 'माता' म्हणतात. गायीचे दूध व लोणी यात कॅल्शियम असते. आयुष्याच्या उत्तरार्धात कॅल्शियमच्या गोळ्या घेण्यापेक्षा लहानपणापासून गायीचे दूध व लोणी आहारात असणे चांगले. भारतीय गायीचे दूध हे खऱ्या अर्थाने पूर्णान्न आहे. म्हणून महाग असले तरी इतर अनावश्यक खर्च कमी करून तेच विकत घ्यावे. गायीच्या तुपाने अन्नाची शुद्धी तर होतेच शिवाय सुख-दु:ख सहन करण्याची शक्ती वाढते.

म्हणून रोजच्या आहारात तुपाचा समावेश करणे चांगले. काही तज्ज्ञांच्या मते भविष्यात जगाला पाण्याची समस्या भेडसावणार आहे. काही ठिकाणी ती आजच निर्माण झाली आहे. गायी-म्हशींच्या शेणामुळे आणि त्यांचे अन्न असलेल्या हिरव्या गवतामुळे जमिनीची पाणी साठवण्याची क्षमता वाढते. जमिनीतील पाण्याचा उपसा झाल्यावर त्याचे पुनर्भरण (Water Recharging) करण्याचा गोपालन व रक्षण हा शाश्वत आणि खात्रीलायक असा नैसर्गिक उपाय आहे. गायीची उपयुक्तता समजून घेतली तर गोरक्षण आणि गोपालन विज्ञानाधिष्ठित आहे, हे कोणीही मान्य करील. गायीच्या उत्पादनांना बाजारात मागणी नसल्याने फक्त शेतीसाठी देशी गाय पाळणे परवडत नाही. परिणामी निकृष्ट अशी रासायनिक शेती करावी लागते. आपल्याला नैसर्गिक शेतीची उत्कृष्ट प्रतीची उत्पादने हवी असतील तर गायीच्या उत्पादनांना मागणी निर्माण करावी लागेल. विज्ञान म्हणजे केवळ मोठमोठे उद्योगधंदे व नवनवीन औद्योगिक उत्पादने वापरणे नव्हे. सृष्टीचक्र हेच एक अद्भुत व सर्वश्रेष्ठ यंत्र आहे. त्यात प्रत्येकाला काहीना काही कार्य नेमून दिलेले आहे. कोणत्याही जीवाची हत्या शेवटी माणसाच्याच मुळावर येणार आहे. मेलेली गाय केवळ काही जणांना एक दिवस जगवते तर जिवंत गाय अनेकांना अनेक वर्षे जगवते. भारतात हिंसेला विरोध करणारा बुद्धावतार होऊन गेला. पण हिंसा आणि मांसाहार हे दोन्ही केवळ सुरूच राहिले असे नाही तर त्याचे प्रमाण वाढले. उगीचच केली जाणारी पशुहत्या व मांसाहार याचे

दुष्परिणाम धर्मशास्त्राने सांगितले आहेत. मी ज्याला या जन्मी खाल्ले तो पुढच्या जन्मी मला खाणार आहे, असा मांस शब्दाचा अर्थ आहे. केवळ आवड म्हणून मांस खाणाऱ्या व्यक्तीला खाटीकापेक्षा जास्त पाप लागते. म्हणून कर्मविपाक व पुनर्जन्म यावर विश्वास असलेल्या लोकांनी या सगळ्याचा जरूर विचार करावा.

भारताला हजारो वर्षांचा वैभवशाली इतिहास आहे. 'वसुधैव कुटुंबकम' म्हणजे विश्व हे एक कुटुंब आहे, अशी आपली प्राचीन शिकवण आहे. गुरुदेव म्हणतात, ''जर अमेरिका म्हणजे या घराचा दिवाणखाना असेल, ऑस्ट्रिया-स्वित्झर्लंड म्हणजे त्यात मांडलेल्या सुंदर वस्तू असतील, युरोप-जपान म्हणजे त्याची उद्यमशीलता असेल तर भारत म्हणजे त्याचे देवघर आहे. घराला घरपण लाभते ते देवघरामुळे.'' मनुष्याप्रमाणे प्रत्येक राष्ट्रालाही त्याचे स्वत:चे व्यक्तिमत्त्व असते. राष्ट्राच्या या व्यक्तिवैशिष्ट्यावर ते ते राष्ट्र विकसित होत असते. अध्यात्म हे भारताचे केवळ व्यक्तिमत्त्वच आहे असे नव्हे तर तो भारताच्या राष्ट्रीय जीवनाचा आत्मा आहे. प्राचीन भारतीय शिक्षण ही खऱ्या अर्थाने सरस्वतीची उपासना होती कारण 'सा विद्या या विमुक्तये' (म्हणजे जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त करते ती विद्या) ही आपली शिक्षणाची कल्पना होती. प्राचीन भारतीय शिक्षणाच्या ध्येयांमध्ये निरोगी राष्ट्रवादाला महत्त्वाचे स्थान होते. काही जणांना वाटते की घडून गेलेल्या गोष्टींचा अभ्यास करणे व्यर्थ आहे. त्यापेक्षा भविष्याकडे पाहावे. परंतु त्यांच्या हे लक्षात येत नाही की, भविष्याकडे पाहता येते ते इतिहासाच्या उजेडातच! जी राष्ट्रे इतिहास विसरतात, त्यांचा वर्तमान दुबळा असतो आणि त्यांना भविष्याची पेरणी व उभारणीही करता येत नाही. म्हणून राष्ट्राच्या नवनिर्मितीसाठी राष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास अनिवार्य, अपरिहार्य आहे. भारताच्या इतिहासाचा अभ्यास नसलेले काही नेते 'We are a nation in the making' असे म्हणत असत. भारताचा सांस्कृतिक राष्ट्रवाद त्यांना कधीच कळला नाही. त्यामुळे भारत कधीच एकसंध राष्ट्र नव्हते, असे त्यांना वाटत असे. भारताला स्वातंत्र्य केवळ आपल्यामुळेच मिळाले आणि भारताचा इतिहास १९४७ पासूनच सुरू झाला, असा त्यांचा गोड गैरसमज होता. परंतु सत्य हे आहे की, आज आपण उपभोगत असलेले स्वातंत्र्य हे गेल्या कित्येक पिढ्यांच्या बलिदानाचे, त्यागाचे फळ आहे. म्हणून आपण ते प्राणपणाने जपले पाहिजे. कारण पारतंत्र्याच्या जोखडाखाली आत्मोन्नती (मग ती व्यक्तीची असो वा राष्ट्राची) केवळ अवघडच नव्हे तर अशक्य असते. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, भारतीय शिक्षणाला अभिप्रेत असलेला निकोप, निरोगी राष्ट्रवाद हा भारताच्या सीमेपर्यंत जाऊन थांबत नाही.


'कृण्वन्तो विश्वं आर्यं' (जगाला सुसंस्कृत बनवूया) ही आपल्या पूर्वजांची प्रतिज्ञा होती. विश्वधर्म प्रस्थापित करण्याची त्यांची जिद्द होती. देशभक्ती किंवा राष्ट्रवाद म्हणजे एकांतिक विचार किंवा काही गृहीत तत्त्वे मनावर बिंबवणे नव्हे तर व्यक्तीला अखिल मानवजातीचा विचार करायला शिकवणे हाच खरा राष्ट्रवाद होय आणि हाच राष्ट्रवाद आपल्या पूर्वजांना अभिप्रेत होता. ज्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या भावना आणि निरोगी राष्ट्रवाद हे सद्गुण रुजवले जातात तेच खरे शिक्षण होय. हजारो वर्षे हेच शिक्षण दिल्या-घेतल्यामुळे भारत विश्वगुरु बनला होता.

गुरुदेव नेहमी सांगतात, 'व्यक्तीपेक्षा कुटुंब महत्त्वाचे, कुटुंबापेक्षा समाज महत्त्वाचा आणि समाजापेक्षा राष्ट्र महत्त्वाचे.' प्रत्येकाने राष्ट्रासाठी यथाशक्ती, यथामती योगदान दिले तर भारत पुन्हा एकदा विश्वगुरु बनेल.

* * *

# काश्मीर फाईल्स

– सौ. सुलभा श्रीकांत आठवले




'काश्मीर फाईल्स' हा विवेक अग्निहोत्री यांचा चित्रपट भारतीय समाजाला मोठा धक्का देणारा ठरला. या चित्रपटाने समस्त हिंदू समाज मुळापासून हादरला, अवाक् झाला कारण बत्तीस वर्षांपूर्वी (इ.स. १९९०) काश्मिरी हिंदू पंडितांच्या वाट्याला ज्या नरकयातना आल्या, अनेकांना हालहाल सोसून मृत्यूला जवळ करावे लागले, स्त्रियांना शारीरिक, मानसिक यातनांना तोंड द्यावे लागले, मुलांना पोरकेपण आले, स्वत:चे घरदार, व्यवसाय सोडून अन्यत्र निर्वासितांचे दीनवाणे, हलाखीचे आयुष्य वाट्याला आले, काश्मीर खोऱ्यातून सर्व हिंदूंना पद्धतशीरपणे, क्रूरपणे बेघर करण्यात आले, हाकलून देण्यात आले, असा सर्व थरकाप उडवणाऱ्या घटनांचा निर्दय क्रम या चित्रपटाने पडद्यावर पुनश्च जिवंत केला.

हे धैर्य पंतप्रधान मोदीजींनी चित्रपट कलावंतांना दिले. पंतप्रधानपद स्वीकारल्यावर त्यांनी आपल्या धर्म संस्कृतीला बळ दिले. राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक पातळीवर सुद्धा जो बहुसंख्याक समाज आवाज उठवत नव्हता, आत्मविश्वासाने मान उंचावत नव्हता, पुरोगामी, सर्वधर्मसमभाव दाखवणारे भोंदू, कट्टर डाव्या विचारसरणीचे पुरस्कर्ते यांच्या दबावाखाली मूक होता, त्यांना मोदीजींनी आत्मविश्वास दिला. 'काश्मीर फाईल्स' हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. या चित्रपटाने सर्वांना अस्वस्थ केले, अंतर्मुख केले, रडवले.

**काश्मीरचा पूर्वेतिहास –** परंतु हा घटनाक्रम १९९० पुरता मर्यादित होता का? तर त्याचे उत्तर 'नाही' असेच आहे. काश्मीरचाच फक्त नाही तर भारताचा गेल्या ८०० वर्षांचा इतिहास आपल्याला खूप काही शिकवतो. जे इतिहास वाचून त्यातून काही बोध घेत नाहीत त्यांच्या चुकांना इतिहास क्षमा करत नाही. आपण भारतीयांनी, हिंदूंनी हा आक्रमणांचा इतिहास कधीच विसरता कामा नये.

बार्हस्पत्य संहितेमध्ये,

'हिमालयम् समारभ्य यावद् इंदु सरोवरम् ।
तम् देवनिर्मितम् देशम् हिंदुस्थानम् प्रचक्षते ॥'

असे आपल्या देशाचे वर्णन आहे. अतिप्राचीन ज्ञानसंपन्न, वैभवशाली वैदिक संस्कृती या हिंदुस्थानची ओळख होती. या देवभूमी, पुण्यभूमी अशा भारतभूमीच्या मस्तकावरील देदीप्यमान मुकुटच म्हणजे नितांत रमणीय, निसर्गसंपन्न, सौंदर्यसंपन्न काश्मीर राज्य! भारतभूमीचे जणू नंदनवनच! निसर्गाने काश्मीरवर मुक्त हस्ताने सौंदर्याची उधळण केली

आहे. हिमालयाच्या सान्निध्यातील काश्मीर म्हणजे जणू पृथ्वीवरचा स्वर्गच!

महाभारतात काश्मीर मंडल असा या राज्याचा उल्लेख आहे. बृहत् संहिता, नीलमतपुराण, राजतरंगिणी या ग्रंथांमध्ये काश्मीरची ऐतिहासिक माहिती मिळते. अनेक संस्कृतग्रंथांमध्येही उल्लेख मिळतो. प्राचीनकाळी येथे वैदिकधर्म प्रचलित होता. नंतरच्या काळात हिंदू धर्मातील काश्मिरीय शैव दर्शनाचा (प्रत्यभिज्ञादर्शन) येथे प्रचार, प्रसार झाला. काश्मीरच्या उत्पत्तीसंबंधी नीलमत पुराणात एक आख्यायिका आहे. सती (पार्वती) येथे ज्या विशाल जलाशयात नौकाविहार करीत असे तिथे जलोद्भव नावाचा राक्षस अनुचरांसह राहात होता. आसपासच्या नाग लोकांना तो फार पीडा देत असे. त्यांच्या विनंतीस अनुसरून कश्यप मुनींनी वराहमूलम् (सध्याचे बारामुला) या ठिकाणी पर्वतांची रांग फोडून सरोवरातील पाणी बाहेर सोडून दिले. त्यामुळे राक्षसाचे सामर्थ्य नष्ट होऊन तो मारला गेला. पुढे कश्यप ऋषींनी सपाट प्रदेशातील लोकांना तिथे वसविले. शेती सुरू केली. कश्यप ऋषींनी सरोवर म्हणजे 'मीर' आटवून निर्माण केलेली भूमी म्हणून तिला 'कश्यपमीर' हे नाव मिळाले. या नावाचेच पुढे 'काश्मीर' झाले.

राजतरंगिणी ग्रंथाचा लेखक 'कल्हण' (मूळ नाव कल्याण) हा काश्मीरच्या एका ब्राह्मणकुलात इ. स. ११०० च्या सुमारास जन्माला आला. याने संस्कृतमध्ये लिहिलेल्या या ग्रंथात महाभारतापासून बाराव्या शतकापर्यंतचा इतिहास ग्रथित केला आहे. हा ग्रंथही संस्कृतमध्ये आहे. येथील सर्व हिंदू राज्यकर्त्यांचा उल्लेख यामध्ये आहे. आपल्या चारही वेदांचे बहुतांश लिखाण, पातंजल योगसूत्रे, शारंगदेवांचे संगीत रत्नाकर, अभिनव भारती अशा उत्तमोत्तम ग्रंथांची निर्मिती काश्मीरमधेच झाली. काश्मिरीय शैवदर्शन हे एक प्राचीन अद्वैत दर्शन म्हणून प्रख्यात आहे.

**परकीयांची क्रूर आक्रमणे –** अशा या देवभूमीच्या वैभवाला, संपन्नतेला, सुखी समाज जीवनाला आक्रमकांची दृष्ट लागली. शक, मुगल, पठाण, तुर्क, अफगाणी अशा असंख्य इस्लामधर्मीय परकियांनी काश्मीरला राक्षसी हिंसेचे क्रूर दर्शन घडवले. हे आक्रमक धर्मवेडे हा शब्द कमी पडेल असे धर्मांध होते. हिंदूंची निर्मम कत्तल करून किंवा त्यांना जुलमाने इस्लाम धर्म स्वीकारायला लावून या आक्रमकांनी येथील हिंदू धर्मसंस्कृतीच्या खुणा नष्ट करण्यास सुरुवात केली. सहिष्णू वृत्ती असलेल्या हिंदूंनी असे क्रौर्य कधी अनुभवलेच नव्हते. काश्मिरी हिंदू पंडितांना मारल्यावर त्यांच्या सोन्याच्या जानव्यांचे वजन ४० मण भरले अशी ऐतिहासिक नोंद आहे. त्यांनी असंख्य हिंदू मंदिरे तोडली. येथील पवित्र स्थानांची नावे बदलून इस्लामी संस्कृती लादण्यास सुरुवात केली. हिंदू राजवटीचा कुठे उल्लेख सुद्धा शिल्लक ठेवला नाही. जुलूम, दहशत याच्या सावटाखाली हिंदूंना काश्मीरमधून वरचेवर विस्थापित व्हावे लागले. १९ व्या शतकापर्यंत हे दुर्दैवाचे फेरे चालूच राहिले. अनेक ठिकाणी मुस्लिम बहुल प्रांत निर्माण झाले. काश्मीरच्या १८ जिल्ह्यांपैकी मीरपूर, मुझफ्फराबाद, गिलगिट, हुन्जा हे चार जिल्हे नवनिर्मित पाकिस्तानने अवैधरित्या बळकावले.

**स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या दुर्दैवी घडामोडी –** १९४७ साली भारताची फाळणी झाल्यावर सरदार वल्लभभाई पटेल यांनी ५६२ छोटी संस्थाने भारतात विलीन केली. काश्मीरचे नाममात्र हिंदू राजा हरिसिंग यांनी पंतप्रधान नेहरूंकडे मदत मागितली तेव्हा हरिसिंगांना डावलून नेहरूंनी शेख अब्दुल्ला यांच्याशी बोलणी करून, त्यांनी जे जे मागितले ते देऊन टाकले. भारताची राज्यघटना अमान्य करून, काश्मीरला मुस्लिम राज्याचा दर्जा देण्याचे कारस्थान अब्दुल्लांनी तडीस नेले. कलम ३७० च्या जाचक अटी लादल्या गेल्या. कलम ३७० चे भूत भारतीयांच्या मानगुटीवर

७० वर्षे बसले. परंतु सरदार पटेलांनी हुशारीने घटनेत या जाचक अटींचा मसुदा 'तात्पुरता, बदलता व विशेष आहे' (Temporary, Transient & special) असा शब्दप्रयोग वापरला. कलम ३७० रद्द करण्याचा अधिकार १९५६ साली घटना समिती बरखास्त झाल्यावर आपोआपच राष्ट्रपतींकडे गेला. कलम ३७० चे संरक्षक कवच मिळाल्याने काश्मीरमधील मुस्लिम उतले, मातले, त्यांना मनमानी करण्यास रानच मोकळे झाले. कारण हिंदू तोपर्यंत अल्पसंख्य झाले होते. नेहरूंच्या 'अव-कृपेने' कलम ३५-अ सुद्धा सर्वांच्या माथी मारण्यात आले. त्यातील सर्व तरतुदी काश्मीरमधील मुसलमानांच्या फायद्याच्याच होत्या. भारतीयांचा तोटा होऊन काश्मीरमधील मुस्लिम राजकीय पक्षांना धन लुटण्याची सुवर्णसंधी देणाऱ्या होत्या. काश्मीरचे भारतात खऱ्या अर्थाने विलिनीकरण त्यामुळे झालेच नाही.

**काश्मीर फाईल्स –** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या नंदनवनाची, काश्मीरची अशी ही दुर्दैवी कहाणी! काश्मीरमध्ये हिंदूंची सुरक्षा स्वातंत्र्यानंतर जास्त जास्त धोक्यात येऊ लागली कारण १९८० च्या पुढे मुस्लिम आतंकवाद्यांनी येथे थैमान घालण्यास सुरुवात केली. नंदनवनात रक्ताचे पाट वाहिले. हिंदूंचे हत्याकांड नित्याचे झाले. भक्त, भाविक, यात्रेकरू यांच्यावर बेछूट गोळीबार सुरू झाला. स्वातंत्र्यानंतर भारताचा कारभार वर्षानुवर्षे, सर्वधर्मसमभाव असे गोंडस नाव देऊन, अल्पसंख्य मुस्लिम जमातीचे तुष्टीकरण करणाऱ्या सेक्युलर काँग्रेसकडे होता. काश्मीरमध्ये तर मुसलमानच बहुसंख्य होते. या सर्व स्फोटक परिस्थितीचा परिणाम म्हणजे १९९० मध्ये झालेले उरल्यासुरल्या काश्मिरी पंडितांचे हत्याकांड. हिंदूंना काश्मीरमधून पूर्ण वजा करण्यासाठी मुस्लिमांनी घडवून आणलेला क्रूर नरसंहार! 'काश्मीर फाईल्स'मध्ये याच थरकाप उडवणाऱ्या इतिहासाचे दर्शन हिंदूंना झाले. भारतीय चित्रपट उद्योगाला हे दाखवण्याचे धैर्य पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि भारतीय जनता पक्षाने दिले. बहुमताच्या बळावर या दोन्ही कलमांचे भूत त्यांनी उतरवले.

मोदीजींनी आता काश्मीरचा विकास करायचा चंग बांधला आहे. तेथे विस्थापितांना पुन्हा प्रस्थापित करायचे असेल तर त्यांना उपजीविकेचे साधन दिले पाहिजे. त्यासाठी वैदिक संस्थांचे पुनरुज्जीवन, तेथे छोटे उद्योगसमूह निर्माण करणे, उत्तम रस्ते निर्माण करणे आणि ग्रामपंचायत समितीला कार्यान्वित करणे, पर्यटन वाढवणे असे उपाय मोदीजींनी सुरू केले आहेत. पण हे काम काही पिढ्यांचे आहे हे निश्चित!

**भारतीय हिंदूंसमोरील भविष्यातील आव्हान–** ३७० आणि ३५-अ ही कलमे रद्द झाल्याने विरोधकांनी भरपूर कांगावा केला. मोदीजींच्या मजबूत परराष्ट्रनीतीमुळे पाकिस्तानलाही अपयश आले. जम्मूकाश्मीर केंद्रशासित प्रदेश झाला. विधानसभा तेथे कार्य करू शकते. लडाख भाग केंद्रशासितच झाला. हिंदुस्थानपासून काश्मीर तोडण्याचे नेहरू-अब्दुल्ला जोडीचे स्वप्न भंगले. राष्ट्रधर्माचे यथोचित पालन करून भारतीय जनता पक्षाने काश्मीर समस्या सोडवली आहे. पण काश्मीरचा इतर राज्यांप्रमाणे सर्वांगीण विकास करण्याचे मोठे आव्हान पार पाडायचे आहे. विकासाबरोबरच अतिरेक्यांचा बंदोबस्त, राष्ट्रद्रोही आणि वरवर मदतीचे सोंग करणारे राजकीय गट यांचा बंदोबस्त, काश्मिरी पंडितांचे पुनर्वसन, सैन्याचे तळ मजबूत करणे अशा अनेक गोष्टींची पूर्तता करणे गजरेचे आहे. यानंतरच काश्मीर भारताचा अविभाज्य भाग होता तसा पुनश्च होईल.

काश्मीरची ही कहाणी सुफळ संपूर्ण सुखाची व्हावी अशी भारतीय हिंदूंची तीव्र इच्छा आहे. परंतु हतबल, पळपुटी मानसिकता हिंदूंना विनाशाकडे नेईल ही या कहाणीची शिकवण हिंदूंना आत्मसात करणे गरजेचे आहे. मोदीजींची कारकीर्द हिंदू समाजाला

दिशादर्शक ठरली आहे. सोनेनाणे, संपत्ती, भोग्यस्त्रिया, जमिनीची मालकी यासाठी मुस्लिम समाज जिहाद करू शकतो. मग अन्य समाजाला स्वरक्षणासाठी शस्त्र हाती घ्यावेच लागेल, हे मोदीजींनी शिकवले आहे. शस्त्र केवळ बंदुकाच नाही तर राष्ट्रहिताचे धोरण, लोकांच्या बहुमताची मतपेटी ही समाजाची शस्त्रेच आहेत याचेही भान मोदीजींनी दिले.

पुरोगाम्यांशी हातमिळवणी करून मुस्लिमांच्या धर्मांधतेला सहानुभूती दाखवणे, राष्ट्रविरोधी कल्पनांचा प्रसार करणे, काश्मीरमध्ये भारताने बेकायदेशीर ताबा घेतला असा प्रचार करणे, हिंसक दहशतवादी चळवळींना खतपाणी घालणे, काश्मीरमध्ये हिंदूंवर अन्याय झाला हे जाणीवपूर्वक नाकारणे, दहशतवादी संघटनांना क्रांतिकारक म्हणून नावाजणे, हिंदू दहशतवादाचा भ्रम फैलावणे, आणि सर्वांवर कळस म्हणजे हिंदूंचे समर्थन करणाऱ्यांना ते सर्व भारतीय जनता पक्षाचे सहानुभूतिदार आणि जातीयवादी आहेत असे म्हणून वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करणे, अशा अनेक कृतींमधून डाव्या पक्षाच्या दांभिकतेचा प्रत्यय हिंदू समाजाला येत आहे. काश्मीर फाईल्स चित्रपटातही ठळकपणे तो अधोरेखित केला आहे.

हिंदुस्थानमध्ये, काश्मीरमध्ये घडलेली ही कहाणी इतर राज्यांमध्येही घडू शकते, ही शक्यता भारताच्या उर्वरित राज्यांमधील वाढणारी मुस्लीम लोकसंख्या आपल्याला सांगत आहे. प. बंगाल, केरळ, पंजाब भारतीय हिंदू समाजाला सावध करत आहेत. समाज आणि राष्ट्र वेगळे नाहीत. एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ही गोष्ट संघसंस्थापक डॉ. हेडगेवार यांनी आग्रहपूर्वक शिकवली. आजच्या भारतात महाराष्ट्रातील दोन युगपुरुषांचे स्मरण अपरिहार्य ठरते. छत्रपती शिवाजीराजे आणि समर्थ रामदास स्वामी!! ज्या काळात हिंदूंचे अस्तित्वच धोक्यात येऊ लागले तेव्हा या महान व्यक्तिमत्त्वांनी देव, देश, धर्म यासाठी प्राण तळहातावर घेतले. समर्थांनी दासबोधात १४ व्या, १९ व्या दशकात,–

१) 'सावधपण सोडू नये.'

२) 'ही धूर्तपणाची कामे । राजकारण करावे नेमे । ढिलेपणाच्या संभ्रमे जाऊ नये ।।--'

३) 'हुंब्यासी हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा । लौंदास पुढे उभा करावा । दुसरा लौंद ।।' असा निर्भय संदेश दिला. शिवरायांनी स्वधर्म संस्कृतीच्या सन्मानासाठी, शौर्य, बुद्धिमत्ता, धाडस यांच्या बळावर सर्व जीवन पणाला लावले. जिवावर उदार होऊन स्वराज्य स्थापलेच.

अस्तित्वाच्या या लढाईत हिंदूंनी असेच निष्ठेने योगदान देण्याची गरज आहे. हिंदुत्व आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद यांना शिरोधार्य करून आपल्या हक्काच्या मातृभूमीवर पाय रोवून उभे राहण्यास शिकले पाहिजे. मन कणखर करून राष्ट्राच्या सुरक्षेसाठी अन्यायाविरुद्ध उभे राहून आणि हिंदू संघटनाला प्राधान्य देऊन, हिंदूंचा विश्वबंधुत्वाचा विचार जगणारा समाज निर्माण केला पाहिजे. कारण भारताला वैभवसंपन्न, नीतिसंपन्न, आत्मनिर्भर करणे आपल्याच हातात आहे.

* * *

**जाग्रत! जाग्रत!!**

'काश्मीर फाइल्स' या चित्रपटाच्या निमित्ताने काही प्रमाणात ज्वलंत सत्य समाजासमोर आले. परंतु फाळणीनंतर झालेले हिंदूंवरील अत्याचार किंवा गांधीवधानंतर ब्राह्मणांवर झालेले अत्याचार, ब्रिटिशांनी केलेले पुण्यातील अत्याचार हे सुद्धा भीषण व भयावह आहेत. आत्तासुद्धा छुपी आक्रमणे चालूच आहेत. तेव्हा सावध व्हा! सजग रहा!

**दि. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी दीदी आपल्याला सोडून गेल्या.**
**दि. २६ फेब्रुवारीला दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या वतीने श्रद्धांजली समर्पणाचा अतिशय हृद्य कार्यक्रम झाला. अनेक मान्यवरांनी, दिग्गजांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या कार्यक्रमात दीदींच्या गाण्याविषयी बोलताना गुरुदेव.**





**दि. २६ फेब्रुवारी २०२२ रोजी कांचीच्या प. पू. शंकराचार्यांच्या (विजयेन्द्र सरस्वतींच्या) जन्मदिनानिमित्त साताऱ्याच्या नटराज मंदिरामध्ये घनपाठी विद्वज्जनांचा गुरुदेव अभ्यंकरांच्या हस्ते सन्मान व नंतर वैदिक परंपरेविषयी प्रवचन असा कार्यक्रम संपन्न झाला.**











**दि. ९ मार्च २०२२ – टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांना 'शङ्कर रामायण-अरण्यकाण्ड' ग्रंथ गुरुदेवांनी भेट दिला. त्यानंतर श्री. शरद कुंटे लिखित 'लोकमान्य टिळक विचार दर्शन' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ टिळक विद्यापीठाच्या सभागृहात गुरुदेवांच्या हस्ते संपन्न झाला.**



**टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपति डॉ. दीपक टिळक यांना 'शङ्कर रामायण अरण्डकाण्ड' भेट देताना गुरुदेव व गुरुपत्नी**





**'लोकमान्य टिळक विचारदर्शन' या ग्रंथाचे प्रकाशन. सोबत डॉ. दीपक टिळक व लेखक शरद कुंटे**



**दि. १४ मार्च २०२२ कर्वेनगर येथील**
**'राजर्षी शाहू महाराज उद्याना'चा उद्‌घाटन समारंभ**
**गुरुदेवांच्या हस्ते संपन्न झाला.**





**कर्वेनगर परिसर आता झपाट्याने विकसित होत आहे.**
**भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशचे सरचिटणीस व**
**नगरसेवक श्री. सुशीलकुमार मेंगडे यांनी**
**नवीन डी.पी. मार्गावर एक उद्यान विकसित केले.**
**त्याचा लोकार्पण सोहळा.**

दि. २३ मार्च २०२२ रोजी गुरुदेवांचे सन्मित्र मा. शिवाजीराव कदम,
कुलपती, भारती विद्यापीठ प्रतिष्ठानला सदिच्छा भेट देण्यासाठी आले होते.
कुलपती म्हणून गुरुदेवांनी त्यांचा सत्कार केला आणि
'शङ्कर रामायण-अरण्यकाण्ड' ग्रंथ भेट दिला.







**दि. २८ मार्च २०२२ 'साप्ताहिक अंबर'ला ३२ वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त हॉटेल चंद्रलोक, लोणावळा येथे वर्धापन सोहळा आयोजित करण्यात आला.**
**गुरुदेवांच्या हस्ते श्री. नंदकुमार वाळंज यांना**
**जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**
**डावीकडून पहिले - साप्ताहिक अंबरचे संपादक श्री. सुरेश साखवळकर**





**साप्ताहिक 'अंबर'च्या विशेषांकाचे प्रकाशन**

**दि. ३ ते ७ एप्रिल २०२२ श्री रामजी संस्थान, तुळशीबाग संस्थानाच्या वतीने गुरुदेवांची प्रवचने श्रोत्यांच्या लक्षणीय उपस्थितीत संपन्न झाली. कोरोनानंतरच्या या प्रवचनमालेचा श्रोत्यांनी भरभरून आस्वाद घेतला.**








दि. ३ एप्रिल २०२२ डॉ. आदित्य अभ्यंकरांचे 'श्रीरामरक्षास्तोत्र' या विषयावरील व्याख्यान. सन एम्पायर, कम्युनिटी हॉल, आनंदनगर, पुणे येथे संपन्न झाले. ओघवती वाणी, संस्कृतवर प्रभुत्व आणि सहजता यामुळे श्रोते मंत्रमुग्ध झाले. 'रामरक्षा रोज म्हणतो पण त्यातील अर्थ आज कळला' अशा श्रोत्यांच्या प्रतिक्रिया होत्या. या कार्यक्रमाचे मानधन गुरुदेवांप्रमाणेच आदित्य प्रतिष्ठानकडे त्यांनी जमा केले.






---

दि. २८ एप्रिल २०२२ वसंत व्याख्यानमाला, पुणे येथे 'स्वामी विवेकानंद आणि सर्वधर्मपरिषदेतील दिग्विजय' या विषयावर डॉ. आदित्य अभ्यंकर यांचे व्याख्यान झाले. TMV Mass Communication या यूट्यूब चॅनेलवर ते उपलब्ध आहे. जरूर पहावे.



**दि. १४ एप्रिल २०२२ सद्गुरु जंगली महाराज १३२ व्या पुण्यतिथी उत्सवात**
**डॉ. आदित्य अभ्यंकर यांचे 'श्रीमंत बाजीराव पेशवे' या विषयावर अप्रतिम व्याख्यान झाले.**
**शिवकालापासून पेशवेकालापर्यंतचा १०० वर्षांचा तेजस्वी इतिहास,**
**बाजीराव पेशव्यांची उज्ज्वल कारकीर्द, त्यांची बलस्थाने, त्यांचे सद्गुण सांगून**
**ऐतिहासिक व्यक्तिरेखा त्यांनी अत्यंत समर्थपणे उभी केली.**










**११० वर्षांची सांगीतिक परंपरा असलेल्या**
**पुणे भारत गायन समाजाचा इतिहास असलेला ग्रंथ**
**दि. १७ एप्रिल २०२२ रोजी**
**सुप्रसिद्ध गायिका सौ. अश्विनी भिडे-देशपांडे यांच्या हस्ते संपन्न झाला.**
**कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुदेव शंकर अभ्यंकर होते.**
**श्रीमती शैला दातार या भारत गायन समाजाच्या विद्यमान अध्यक्षा आहेत.**



## देवगंधर्व पं. भास्करबुवा बखले

अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताचा परोत्कर्ष साधणाऱ्या ऋषितुल्य, चारित्र्यसंपन्न गायनाचार्यांमध्ये देवगंधर्व पं. भास्करबुवा बखले यांचा गौरव कौस्तुभमण्यासम चिरंजीव, 'एकमेवाद्वितीय' असा आहे. ग्वाल्हेर, आग्रा आणि जयपूर या तीन घराण्यांचा त्यांनी केलेला अद्भुत समन्वय, त्यातून निर्मिलेली स्वर्गीय गायनशैली आणि स्वरश्रुतींची त्यांना प्राप्त झालेली सिद्धी-सगळेच परिकथेसारखे आहे. 'चणे खावे लोखण्डाचे । तेव्हा ब्रह्मपदी नाचे ॥' या संत वचनानुसार कष्टांचे डोंगर फोडून, अपरंपार परिश्रमाने भास्करबुवांनी स्वरसिद्धी प्राप्त केली.

भास्करबुवा म्हणजे 'यासम हाच'. संगीत स्वयंवर, द्रौपदी, विद्याहरण आणि मानापमान (मोजकी पदे) अशा साडेतीन नाटकांतील पदांना भास्करबुवांनी घरंदाज बंदिशींचा साज चढवून राजप्रासादात सुप्रतिष्ठित केले, हा खरोखरच चमत्कारच आहे. लोकोत्तर महापुरुषांचे लोकोत्तर कार्य संस्थांच्या माध्यमातून चिरंजीव होत असते. 'पुणे भारत गायन समाज' ही नादमधुर श्रुतींनी निनादलेली संस्था म्हणजे भास्करबुवांचे संजीवन स्मारक आहे.

भारताच्या सांगीतिक इतिहासात 'एक सुरेल स्वर यात्रा' या ग्रंथाने मोलाची भर घातली आहे, हे नि:संशय!

शुभं भवतु ।

**– गुरुदेव**

दि. २५ एप्रिल २०२२
'वैश्विक संत भारती'च्या भूमीवर तळेगाव, लोणावळा, मावळ प्रांतातील मान्यवरांबरोबर बैठक संपन्न झाली.
गुरुदेवांनी सर्वांना प्रकल्प समजावून सांगितला.





## आगामी कार्यक्रम

**दि. २८ मे २०२२**
**दूरदर्शनवर स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील लघुपट दाखवला जाणार आहे.**
**त्यातील गुरुदेवकथित काही उत्कट प्रसंगांचे चित्रीकरण!**





दि. १० एप्रिल २०२२
या मंगल दिनी प्रतिष्ठानच्या कार्यालयात रामनवमी संपन्न झाली.
गुरुदेवांनी जन्मकालाचे संगीत निरूपण केले.
कार्यकर्ते भजनात व उत्सवात रंगून गेले.







दि. ५ मे २०२२

कलावर्धिनी फौंडेशन व वसंत ठकार फौंडेशन यांच्या वतीने 'श्रीराम करुणालहरी' या पं. रामकृष्णबुवा वझे यांच्या काव्यावर आधारीत संगीत कार्यक्रम बालशिक्षण सभागृहात संपन्न झाला.

पं. सुहास व्यास व कलाकारांनी गायन केले. श्री. मिलिंद गुणे संगीत संयोजक होते. तर निरूपणकार होते गुरुदेव शंकर अभ्यंकर







